सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अपघातामागे बड्या नेत्याचा हात, नागरी उड्डाण मंत्री राममोहन नायडू यांचा राजीनामा घ्या

### रोहित पवारांची दिल्लीतून थेट मोदींकडे मागणी; राहुल गांधींनाही घातलं साकडं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं. त्यांच्या विमानात अपघताबाबत अनेक संशय निर्माण झाले आहेत. अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवारांनी हा प्रश्न सातत्याने उचलून धरलाय. या अपघाताबाबत अनेक प्रश्न निर्माण करून त्यांनी काही पुरावे सादर करण्याचा प्रयत्न केलाय. मुंबईत पत्रकार परिषद घेतल्यानंतर आज रोहित पवारांनी दिल्लीतील शरद पवारांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद देऊन या प्रकरणी त्यांनी थेट आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडे



सखोल चौकशीची मागणी केली आहे. यावेळी त्यांनी नागरी उड्डाण मंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

**नागरी उड्डाण मंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी**

मुंबईतील पत्रकार परिषदेत रोहित पवारांनी ब्लॅक बॉक्स आणि इतर तांत्रिक त्रुटी माध्यमांसमोर मांडल्या. यावेळी त्यांनी डीजीसीएतील अनेक अधिकाऱ्यांच्या तपासावरही आक्षेप घेतला. तसंच, व्हिसीआर कंपनीवर बंदी घालण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी केंद्रातील मोठ्या नेत्याचा व्हिसीआर कंपनीच्या मालकाला साथ असल्याचा आरोप केला होता. आता, याही पुढे जाऊन रोहित पवारांनी थेट केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. नागरी उड्डाण मंत्री राममोहन नायडू आहेत.

**देशातील प्रभावशाली नेत्यांनी यात लक्ष घालावं**

नागरी उड्डाण मंत्री यांच राजीनामा घेण्याची मागणी मी या पत्रकार परिषदेतून करणार आहे. या प्रकरणात मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना विनंती करणार आहे, असं रोहित पवार सुरुवातीलाच म्हणाले. तसंच, या प्रकरणामागे अत्यंत प्रभावशाली लोकांचा सहभाग असल्याचंही रोहित पवार म्हणाले.

व्हिसीएआरला कोणी वाचवत असेल तर तोही एक षडयंत्राचा भाग असू शकतो. डीजीसीएचे मोठे अधिकारी यामागे आहे, तर मला वाटतं की अजित पवारांना न्याय द्यायचा असेल तर महाराष्ट्र आणि देशातील लोक प्रयत्न करत आहेत, पण या तपासात न्याय देण्याची गरज असेल तर या देशातील प्रभावशाली लोकांनी यात लक्ष घातलं पाहिजे. कारण, तेच याप्रकरणी न्याय देऊ शकतात. कारण, या प्रकरणातील लोकही प्रभावशाली आहेत. भारताचे सर्वांत मोठे प्रभावशाली लोक नरेंद्र मोदी आणि अमित शाह हेच त्यांना न्याय देऊ शकतील. त्यांनी या प्रकरणी जातीने लक्ष घालावं. मी नरेंद्र मोदींना याविषयी इमेलद्वारे पत्र लिहिणार आहे, असं रोहित पवार म्हणाले.


## अर्थसंकल्पीय अधिवेशन विरोधी पक्षनेत्यांविना

### इतिहासात पहिल्यांदाच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त असल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशनात उभय सभागृहांचे कामकाज विरोधी पक्षनेताविना पार पडेल, अशी एकूण चिन्हे आहेत. राज्याच्या इतिहासात दोन्ही सभागृहांची विरोधी पक्षनेतेपद रिक्त असण्याचा प्रकार पहिल्यांदात घडत आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर १५ वी विधानसभा गठीत झाली. नव्या विधानसभेचे पहिले अधिवेशन डिसेंबर २०२४ मध्ये पार पडले. सर्वसाधारणपणे पहिल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची निवड होते. मात्र विरोधी बाकावरील सर्वात मोठ्या पक्षाच्या सदस्यांची संख्या ही एकूण विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के इतकी नसल्याचे कारण देत विधानसभा अध्यक्षांकडून विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय प्रलंबित ठेवण्यात



आला आहे.ठाकरे गटाचे माजी आमदार अंबादास दानवे यांची विधान परिषदेची मुदत संपल्यानंतर विधानसभेप्रमाणे विधानपरिषदेतही हेच चित्र निर्माण झाले. नागपूर अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा चर्चेत आला तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय हा विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापतींच्या अखत्यारीतील असल्याचे सांगितले होते. त्यांनी घेतलेला निर्णय सरकारला मान्य असेल. विरोधी पक्षनेतेपदाबाबत सरकारचा कोणताही दुराग्रह नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले होते. तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षनेतेपदाबाबत नियमांचा अभ्यास सुरू असल्याचे स्पष्ट केले होते.विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे २० आमदार आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून विधानसभा विरोधी पक्षनेते पदासाठी ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र ४ मार्च २०२५ रोजी देण्यात आले. या पत्राला पुढील महिन्यात एक वर्ष पूर्ण होईल.

ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये संपली. त्यामुळे काँग्रेसने विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेतेपदासाठी सतेज पाटील यांच्या निवडीचे पत्र दिले होते. विरोधी पक्षाच्या या दोन्ही पत्रांवर अजून कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे गेल्या डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनाप्रमाणे येत्या सोमवारपासून (२३ फेब्रुवारी) सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशनसुद्धा विरोधी पक्षनेत्याविना पार पडणार आहे.

## फेब्रुवारीचा तिसरा शनिवार ठरला ‘मानहानी दिन’

### राहुल गांधी भिवंडी, राऊत मालेगाव तर सावंत मुंबई कोर्टात हजर; तिघांचाही धागा एकच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर आज फेब्रुवारी महिन्याचा तिसरा शनिवार मानहानी व अब्रूनुकसानीच्या प्रकरणांमुळे चांगलाच गाजला. राज्यातील ३ वेगवेगळ्या शहरांत ३ वेगवेगळ्या मोठ्या नेत्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले. योगायोगाने या सर्व प्रकरणांचा धागा मानहानीशी जोडला होता. त्यामुळे राजकीय वर्तुळात शनिवार हा मानहानी दिन ठरल्याची चर्चा रंगली होती. काँग्रेस नेते राहुल गांधी भिवंडीत नवा जामीनदार हजर करण्यासाठी कोर्टात हजर झाले. तर मालेगावात एकमेकांचे कट्टर राजकीय वैरी समजले जाणारे संजय राऊत व मंत्री दादा भुसे यांनी एका प्रकरणात समेटाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकले. तिकडे मुंबईत ठाकरे गटाचेच खासदार अरविंद सावंत यांनाही मानहानीच्या एका खटल्यात कोर्टात हजेरी लावावी लागली.

**भिवंडी कोर्टात राहुल गांधींची हजेरी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी एक वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी त्यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या मानहानीच्या खटल्याची आज भिवंडी न्यायालयात सुनावणी पार पडली. या प्रकरणात त्यांना पूर्वीच जामीन मंजूर झाला होता. पण त्यांचे जामीनदार शिवराज पाटील चाकूरकर यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांना नवा जामीनदार कोर्टापुढे हजर करणे आवश्यक होते. त्या प्रक्रियेसाठी ते न्यायालयात प्रत्यक्ष हजर झाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांचा जामीन घेतला.

यावेळी झालेल्या सुनावणीसाठी न्यायालय परिसरात



कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जवळपास १५-२० मिनिटे चाललेल्या या सुनावणीत जामीन प्रक्रियेची पूर्तता करण्यात आली. या प्रकरणी ४ एप्रिल रोजी मुख्य मुद्द्यांवर सुनावणी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

**मालेगावात ’कट्टर वैऱ्यांची’ दिलजमाई**

दुसरीकडे, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे आज वेगळीच राजकीय रंगत पाहायला मिळाली. येथे अनेकदा सार्वजनिकरित्या एकमेकांवर चिखलफेक करणारे ठाकरे गटाचे संजय राऊत व शिंदे गटाचे मंत्री दादा भुसे हे दोघेही मानहानीच्या एका प्रकरणात न्यायालयात हजर झाले. राजकीय वक्तव्यांमधून झालेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे हे प्रकरण न्यायालयात गेले होते.

पण शनिवारी न्यायालयीन प्रक्रियेत दोन्ही बाजूंनी अत्यंत सौम्य भूमिका घेतल्याचे दिसून आले. सूत्रांच्या माहितीनुसार, परस्परांवरील आक्षेपार्ह वक्तव्यांबाबत स्पष्टीकरण देत दोन्ही बाजूंनी हा वाद मिटवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे कट्टर राजकीय विरोधकांमध्ये ’दिलजमाई’ झाल्याची चर्चा रंगली. या निमित्ताने राजकारणात कुणीही कुणाचा कायमस्वरूपी शत्रू नसतात, ही उक्ती पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

**राऊत - भिसे समेटामुळे नवे समीकरण?**

आजच्या तिन्ही प्रकरणांचे वेगवेगळे राजकीय परिणाम होण्याची शक्यता आहे. राहुल गांधी यांच्या प्रकरणाचा राष्ट्रीय पातळीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तर संजय राऊत व दादा भुसे यांच्यातील समेटामुळे स्थानिक राजकारणात नवी समीकरणे तयार होऊ शकतात.

**मुंबईत अरविंद सावंतांची कोर्टात उपस्थिती**

तिकडे मुंबईत ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनाही मानहानीच्या एका खटल्यात न्यायालयात हजर राहावे लागले. अरविंद सावंत यांनी एका पत्रकार परिषदेत शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या शायना एन सी यांचा उल्लेख ’इम्पोर्टेड माल’ असा केला होता. शायना एन सी यांनी त्यांचे हे विधान महिलांचा अवमान करणारे असल्याचे नमूद करत त्यांच्याविरोधात मानहानी व विनयभंगाची तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी सावंत आज कोर्टात हजर झाले. यावेळी झालेल्या सुनावणीत कोर्टाने दोन्ही बाजूंची बाजू ऐकून घेतली आणि पुढील तारखेची नोंद केली.

या तीन वेगवेगळ्या घटनांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापलेले दिसले. एकाच दिवशी तीन महत्त्वाच्या नेत्यांना मानहानीच्या प्रकरणांत न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागणे हा एक मोठा योगायोग मानला जात आहे. यामुळे राजकीय वक्तव्यांची मर्यादा, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी व कायदेशीर परिणाम यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## भारत-ब्राझील संबंधांना नवी दिशा

### द्विपक्षीय व्यापार करारावर आज अखेर शिक्कामोर्तब



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

भारत आणि ब्राझीलमधील द्विपक्षीय संबंधांत आज एक नवा अध्याय जोडला गेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुइज इनासियो लुला डी सिल्वा यांच्यात झालेल्या उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चेनंतर भारत-ब्राझील ट्रेड डीलवर अधिकृत स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे व्यापार, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील सहकार्याला नवी गती मिळणार आहे.

पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष लुला आणि त्यांच्या प्रतिनिधिमंडळाचे भारतात स्वागत करताना म्हटले, राष्ट्राध्यक्ष लुला आणि त्यांच्या प्रतिनिधिमंडळाचे भारतात स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. त्यांच्या दृष्टीकोनातून आणि प्रेरणादायी नेतृत्वातून भारत-ब्राझील संबंधांना दीर्घकाळ लाभ झाला आहे.पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत दोन्ही नेत्यांमध्ये अनेकदा भेटी झाल्या असून, प्रत्येक वेळी भारताबद्दल राष्ट्राध्यक्ष लुलांची मैत्री आणि विश्वास स्पष्टपणे दिसून आला आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, राष्ट्राध्यक्ष लुलांचा हा दौरा ऐतिहासिक -ख इम्पॅक्ट समिटला नवी ऊर्जा देणारा असून, भारत-ब्राझील स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप अधिक मजबूत करणार आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण फरार कृष्णा आंधळे तीनदा गावी येऊन गेला


### धनंजय देशमुख यांचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बीड**

संतोष देशमुख हत्याकांडातील फरार आरोपी कृष्णा आंधळे हा आतापर्यंत ३ वेळा मस्साजोगला येऊन गेल्याची धक्कादायक बाब आज समोर आली. त्यामुळे पीडित देशमुख कुटुंबीयांनी त्याच्यापासून आपल्या जिवाला धोका असल्याचा दावा करत सुरक्षेची मागणी केली आहे.

संतोष देशमुख हत्याकांडाची आज बीडच्या सत्र न्यायालयात सुनावणी झाली. त्यात न्यायालयाने सरकारी पक्षाला बचाव पक्षाला योग्य ते सर्व दस्तऐवजांची पूर्तता करण्याचे कडक निर्देश दिले. आजच्या सुनावणीत आरोपींचे वकील, पुराव्यांची कमतरता व सरकारी





वकिलांच्या नियुक्तीवर जोरदार खडाजंगी झाली. आरोपी क्रमांक ३ ते ७ यांनी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांना या प्रकरणातून वगळण्याची मागणी केली. त्यांनी तसा अर्ज कोर्टात सादर केला. कोर्टाने सरकारी पक्षाला या अर्जावर आपले लेखी म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले.

आरोपी जयराम चाटे याने आपला वकील बदलला आहे. आता त्याच्यातर्फे वकील एम के वाघीरकर हे युक्तिवाद करणार आहेत. आरोपी प्रतीक घुले यानेही वकील लावण्यासाठी कोर्टाकडे १० ते १५ दिवसांचा वेळ मागितला आहे. कोर्टाने त्यांना हा वेळ दिला. त्यानुसार आता ६ मार्च रोजी या प्रकरणाची पुढील सुनावणी होईल

**कृष्णा आंधळे मस्साजोगला आला?**

दुसरीकडे, आजच्या सुनावणीनंतर पत्रकारांशी बोलताना संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याच्याविषयी एक नवा दावा केला. ते म्हणाले की, प्रस्तुत प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे मागील ६ महिन्यांत ३ वेळा आमच्या गावी येऊन गेला. यामुळे आमच्या कुटुंबाच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. आम्ही ही गोष्ट या प्रकरणाचा तपास करणाऱ्या सीआयडीच्या कानावर घातली आहे. त्यांनीही हा फरार आरोपी गावात येऊन गेल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्याला लवकरात लवकर अटक करून त्याची संपूर्ण बीड जिल्ह्यात धिंड काढण्यात यावी.

## उद्धवसेनेच्या कोट्यातून मनसे ‘स्वीकृत’ झाली नाही

### साईनाथ दुर्गे, कैलास पाठक, माधुरी मांजरेकर यांची निवड?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई**

स्वीकृत नगरसेवकांबाबत उद्धवसेनेकडून माधुरी मांजरेकर, साईनाथ दुर्गे व कैलास पाठक यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. यामुळे उद्धवसेनेच्या कोट्यातून एक स्वीकृत नगरसेवकपद देण्याच्या मनसेचा प्रस्ताव उद्धवसेनेने नाकारल्याचे स्पष्ट झाले. विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर या स्वीकृत नगरसेवकांची नावे महापौर रितू तावडे यांच्याकडे सादर करतील. त्यानंतर २५ फेब्रुवारीला त्यांची अधिकृत घोषणा होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.



मुंबई पालिकेत ६५ नगरसेवक निवडून आल्याने तीन स्वीकृत नगरसेवक उद्धवसेनेला निवडता येणार आहे. मात्र, युतीमध्ये निवडणूक लढलेल्या मनसेने एक स्वीकृत नगरसेवक मिळावे, असा प्रस्ताव उद्धवसेनेला पाठविला. मनसेकडून वाहतूक सेनेचे अध्यक्ष संजय नाईक, कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण व विद्यार्थी सेनेचे राज्य संघटक चेतन पेडणेकर यांची नावे चर्चेत होती.

महापालिका निवडणुकीत वडाळा येथील १७८ प्रभागमधून उद्धवसेनेच्या उपविभाग संघटक माधुरी मांजरेकर यांचे नाव निश्चित करण्यात आले होते; परंतु जागावाटपात प्रभाग मनसेला गेल्याने त्या नाराज झाल्या होत्या. मात्र, त्यांनी मनसे उमेदवारांच्या प्रचारासाठी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला होता. उद्धवसेनेचा आक्रमक चेहरा अशी ओळख असणाऱ्या मांजरेकर यांनी ‘निष्ठेचे फळ’ मिळाले आहे. सभागृहात पक्षाचा आवाज बुलंद ठेवण्यास कटिबद्ध राहीन, अशी भावना व्यक्त केली आहे.

## सरपंच पाहणार प्रशासक म्हणून कारभार; मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्य सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२१मुंबई**

राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत प्रशासकपदाचा गुंता सोडवला आहे. आता ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमले जाणार आहे. यामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे निर्माण होणारी पोकळी टळणार आहे.

या आधी जानेवारी महिन्यात काढलेल्या परिपत्रकानुसार, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र, राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.

संपादकीय ......

# गटबाजी अन सत्तेची चढाओढ

काँग्रेसने चंद्रपुरातील वचपा भिवंडीत काढल्याची चर्चा आहे. नागपूर महापालिकेत स्थायी समिती सभापतिपदी कुणाची वर्णी लागणार, याकडे लक्ष लागले आहे. चंद्रपूरच्या महापौरपदाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला जे आले तेच भिवंडीत भाजपच्या वाट्याला आले. चंद्रपूरमध्ये काँग्रेसची सत्ता येणार, हे अपेक्षित असताना भाजपचा महापौर निवडून आला. शिवसेना उबाठा गटाने महाविकास आघाडीऐवजी भाजपला साथ दिली. मातोश्रीने या बंडखोरीची गंभीर दखल घेतली, असे दाखविले खरे; मात्र पुढे काहीच न झाल्याने भाजप, शिवसेना परंपरागत मैत्रीची वीण अधिक घट्ट होण्याच्या वाटेवर असल्याची चर्चा रंगली. मुंबई मनपात भाजपला 'वॉक ओव्हर' दिला गेल्याने या शंकेला अधिक बळ मिळाले. चंद्रपूर काँग्रेसमधील दगाबाजीची चर्चा गल्ली ते दिल्ली झाली.

चंद्रपुरात ठरलेल्या गणिताला, दिलेल्या शब्दाला मित्रपक्ष जागला नाही. नेत्यांचा बेबनाव, समन्वयाचा अभाव यात काँग्रेसच्या हातून सत्ता गेली. काँग्रेसचे विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील संघर्ष मनपा निवडणुकीनंतरच्या घडामोडीत अधिक वाढला. धानोरकर यांनी वडेट्टीवारांवर पुन्हा निशाणा साधला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दखल घेतली; मात्र ते टिपू सुलतान वादात अडकल्याने ही कारवाई मागे पडली, असे दिसते. आता काँग्रेसने चंद्रपूरचा वचपा भिवंडीत काढला अशी चर्चा आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संबंधित सहा भाजप नगरसेवकांवर निलंबन आणि कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

नागपुरात स्थायी समिती कुणाकडे राहणार, याचा निर्णय अद्याप होऊ शकलेला नाही. आता २४ फेबुवारीला बैठक होणार आहे. स्थायी समितीचे १६ सदस्य निवडले जातील. यातूनच अध्यक्षपदी कुणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपने नागपुरात महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्ष असे महिलाराज राहणार असल्याचे संकेत यापूर्वीच दिले आहेत. परिवहन समिती आणि इतर समित्यांवर कुणाची वर्णी लागणार, याविषयी उत्सुकता आहे. मनपा निवडणुकीचे निकाल लागून महिना उलटला आहे. पदाधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेला विलंब होत असल्याने भाजपमधील गटबाजी उघड झाली आहे.

निष्ठावंत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते नाराज असल्यानेच १५१ सदस्यांच्या मनपात १०२ सदस्यांचे बहुमत असताना सत्तारूढ भाजपमध्ये एकमत होत नसल्याचे चित्र आहे. स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडीसोबतच मनपातील दहा स्वीकृत सदस्यांच्या निवडीकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसने पराभूत उमेदवारांना संधी नाही, असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनेकांचा स्वप्नभंग होणार आहे. दुसरीकडे भाजपकडील यादी मोठी आहे. प्रत्येक १० सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य करण्याच्या महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवल्याने अनेक इच्छुकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. दिल्ली ते गल्ली भाजपची सत्ता असल्याने अगदी कट्टर विरोधक असला, तरी कुणालाही सत्तेचा मोह टाळता येत नाही हे दिसत आहे. यातूनच भाजपच्या बॅनरवर काँग्रेसचे शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांच्या फोटोची चर्चा उपराजधानीत रंगली.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदान, अर्जासोबत ही कागदपत्रे लागतील?




**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

महाडीबीटीच्या माध्यमातून राज्य कृषी यांत्रिकीकरण योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत ट्रॅक्टरपासून तर वेगवेगळ्या यंत्रापर्यंत लाभ दिला जातो. तुम्हाला जर या योजनेंतर्गत ट्रॅक्टर घ्यावयाचा असल्यास कोणती कागदपत्रे लागतील, हे आजच्या लेखातून समजून घेऊयात...शेतकऱ्याचे आधार कार्ड असणे अनिवार्य आहे

शेतकऱ्याकडे ७/१२ उतारा व ८ अ असावा

शेतकरी अनु. जाती, अनु.जमातीमधील असल्यास जातीचा दाखला आवश्यक

फक्त एकाच औजारासाठी अनुदान देय राहील, म्हणजेच ट्रॅक्टर किंवा यंत्र/ अवजार

कुटुंबातील व्यक्तीच्या नावे ट्रॅक्टर असल्यास , ट्रॅक्टरचलित औजारासाठी लाभ मिळण्यास पात्र असेल परंतु ट्रॅक्टर असल्याचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक

एखाद्या घटकासाठी / औजारासाठी लाभ घेतला असल्यास त्याच घटक/ औजारासाठी पुढील १० वर्षे अर्ज करता येणार नाही, परंतु इतर औजारासाठी अर्ज करता येईल.

उदा. एखाद्या शेतकऱ्याला सन २०१८-१९ मध्ये ट्रॅक्टरसाठी लाभ देण्यात आला असेल तर पुढील १० वर्षे ट्रॅक्टरसाठी लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाही सन २०१९-२० मध्ये इतर औजारासाठी लाभापात्र राहील.

आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड

ॠीशी खऊ

७/१२ उतारा

८ अ दाखला

खरेदी करावयाच्या अवजाराचे कोटेशन व केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त तपासणी संस्थेने दिलेला तपासणी अहवाल

जातीचा दाखला (अनु. जाती व अनु. जमातीसाठी )

स्वयं घोषणापत्र

पूर्वसंमती पत्र

अधिक माहितीसाठी आपल्या गावातील कृषी साहाय्यक यांची भेट घ्या.

# चिंता आणि अस्वस्थता कमी करायची आहे? कोणता उपाय?



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

आधुनिक जीवनशैलीत चिंता आणि अस्वस्थता हे आता कॉमन झाले आहे. धावपळीच्या जीवनशैलीत वाढत्या चिंतेवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम होण्यासाठी 'नियमित व्यायाम' हे एक प्रभावी अस्त्र असल्याचे एका ताज्या संशोधनातून समोर आले आहे. जाणून घेऊया या संशोधनाविषयी....




अशा व्यक्तींमध्ये रागाचे प्रमाण कमी

'हेल्थलाइन'च्या रिपोर्टनुसार, 'एक्टा सायकॉलॉजिका' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, ज्या व्यक्तींची हृदय आणि श्वसन तंदुरुस्ती उत्तम असते, त्यांच्यामध्ये रागाचे प्रमाण कमी आणि भावनिक लवचिकता अधिक असल्याचे दिसून आले आहे.

या संशोधनासाठी १८ ते ४० वयोगटातील ४० निरोगी व्यक्तींची दोन गटांत विभागणी करण्यात आली होती. अभ्यासादरम्यान असे आढळले की, तणावपूर्ण प्रसंगात कमी तंदुरुस्त असलेल्या व्यक्तींच्या तुलनेत शारीरिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या व्यक्ती अधिक शांत राहतात. विशेष म्हणजे, व्यायाम न करणाऱ्या लोकांमध्ये चिंतेची पातळी मध्यमवरून उच्च होण्याचा धोका ७७५ टक्क्यांनी अधिक असल्याचे समोर आले आहे.

नियमित व्यायाम मनाच्या सदृढतेसाठीही पूरक

प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. निसा केयाशियन यांच्या मते, उत्तम भावनिक आरोग्यासाठी शारीरिक हालचाल हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मी माझ्या रुग्णांना नेहमीच नियमित व्यायामाचा सल्ला देते. तसेच, क्लिनिकल सायकोलॉजिस्ट डॉ. कारिन विल्नर यांनी नमूद केले की, हा अभ्यास मानसिक समस्या नसलेल्या लोकांना तणावाचे नियोजन कसे करावे, हे समजून घेण्यास मदत करतो.

व्यायामाचे फायदे

जागतिक आरोग्य संघटनेच्या (थकज) नियमित व्यायामाचे सांगितलेले फायदे खालीलप्रमाणे...

नियमित व्यायामामुळे केवळ मानसिकच नव्हे तर शारीरिक व्याधींचा धोकाही कमी होतो:

हृदयविकार, कर्करोग आणि मधुमेहाचे प्रतिबंधात्मक नियंत्रण.

मेंदूचे आरोग्य सुधारणे आणि चांगली झोप लागणे.

नैराश्य आणि चिंतेच्या लक्षणांमध्ये घट.

# ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबलचा 'परिवर्तन २०२६' सोहळा उत्साहात

## १२००हून अधिक उद्योजकांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१ पुणे**

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल तर्फे आयोजित वार्षिक बिझनेस कॉन्क्लेव्ह 'परिवर्तन २०२६' वाकड येथील हॉटेल टीप टॉप इंटर नॅशनल येथे दिमाखात पार पडला. देश-विदेशातील सुमारे १२००हून अधिक उद्योजकांनी उपस्थित राहून नेटवर्किंग, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचा नवा अध्याय लिहिला.ब्राह्मण समाजातील उद्योजक, उद्योगपती आणि व्यावसायिकांना एकत्र आणून परस्पर सहकार्याची सशक्त साखळी निर्माण करणे हा या दोन दिवसीय संमेलनाचा प्रमुख उद्देश होता. पॅनेल चर्चासत्रे, प्रेरणादायी व्याख्याने, फायरसाईड चॅट्स, बी-टू-बी कॉन्क्लेव्ह, पॉवरपॉईंट सादरीकरणे आणि संवादात्मक सत्रांमधून उद्योगविश्वातील नव्या संधींवर सखोल चर्चा झाली. 'परिवर्तन'चे कॅप्टन श्री. नंदन गुमास्ते यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.कार्यक्रमाला अखिल भारतीय संत समितीचे महासचिव स्वामी जितेंद्रानंद सरस्वती, राज्यसभेच्या सदस्या डॉ. मेधा कुलकर्णी,कामत हॉटेल ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. विठ्ठल व्यंकटेश कामत, उद्योगपती श्री. प्रकाश भालेराव आणि श्री. उदय निरगुडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते इइछत्रृ स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले तसेच प्रायोजकांचा गौरव करण्यात आला. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी भारतातील उद्योजकतेच्या व्यापक संधींचा वेध घेत ब्राह्मण व्यावसायिकांच्या एकत्रीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. स्वामी जितेंद्रानंद सरस्वती यांनी उद्योजकांनी सात्त्विकता, संयम आणि समाजसेवा जोपासावी, असे मार्गदर्शन केले. डॉ. विठ्ठल कामत यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाचे अनुभव कथन करत उपस्थितांना प्रेरित केले.बीबीएनजी ग्लोबलचे संस्थापक अध्यक्ष श्री. श्रीपाद कुलकर्णी यांनी 'परिवर्तन'च्या माध्यमातून धोरणात्मक व परस्परपूरक व्यावसायिक संबंध दृढ करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी 'उद्यम कौस्तुभ पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आले. विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल अनघा व महेश पाठक, सुप्रिया श्रीकांत बडवे, डॉ. संजय मुकुंद पैठणकर, आनंद गानू, डॉ. अजय शेष, सुयोग नारावणे आणि राजीव पानसे यांचा सन्मान करण्यात आला.समारोप संत ज्ञानेश्वर महाराजांनी रचलेल्या 'पसायदान'च्या सामूहिक पठणाने झाला.

# जेनेश्वर दीक्षा कार्यक्रमात हजारो भाविकांची गर्दी

## मुक्तागिरी मध्ये पहिल्यांदाच आयोजन

## २२ मुनी नी घेतली दीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुक्तागिरी-** मोक्ष मार्गावर चालताना अनेक प्रकारच्या बाधा संकट येतात मात्र धर्म मार्गावर चालणारा व्यक्ती याच्यावर विजय मिळवून मोक्ष मार्गावर चालत असतो ,यामुळे मोक्ष मार्ग अनेक होऊ शकत नाही असा संदेश आचार्य श्री १०८ समय सागर महाराज यांनी सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे होऊ घातलेल्या जैनेश्वर दीक्षा कार्यक्रमात म्हणाले..या वेळी २२ एलक व श्रुल्लक महाराजा दीक्षा दिली..१.ऐलकश्री उपशमसागर जी महाराज२.ऐलकश्री औचित्यसागर जी महाराज३.ऐलकश्री गहनसागर जी महाराज४.ऐलकश्री कैवल्यसागर जी महाराज५.ऐलकश्री सुदृढ़सागर जी महाराज६.ऐलकश्री समकितसागर जी महाराज७.ऐलकश्री उचितसागर जी महाराज८.ऐलकश्री अथाहसागर जी महाराज९.ऐलकश्री उत्साहसागर जी महाराज१०.ऐलकश्री अमापसागर जी महाराज११.ऐलकश्री उद्यमसागर जी महाराज१२.ऐलकश्री गरिष्ठसागर जी महाराज१३.ऐलकश्री गौरवसागर जी महाराज१४.क्षुल्लकश्री जाग्रतसागर जी महाराज१५.क्षुल्लकश्री आदरसागर जी महाराज१६.क्षुल्लकश्री चिद्रूपसागर जी महाराज१७.क्षुल्लकश्री स्वरुपसागर जी महाराज१८.क्षुल्लकश्री सुभगसागर जी महाराज१९.क्षुल्लकश्री सविनयसागर जी महाराज२०.क्षुल्लकश्री समन्वयसागर जी महाराज२१.क्षुल्लकश्री हीरकसागर जी महाराजया वेळी देश भारतातून ४०ते ४५ हजार भाविक दाखल झाले होते..याअतुल कळमकर ,प्रसाद संगई ,आतुनतोष जोरापुरकर,अनुप गांधी,शशांक चवरे,विवेक फुलंबरकर,सचिन संगई,दीपक पेंढारी, राकेश डोणगावकर,वैभव मुधोळकर,सुशांत जिंतूरकर,किर्ती देवलसी,प्रकाश जैन,सुरेंद्र खंडारे,प्रवीण खेडकर,संदीप खंडारे,आनंद वैध,रुपेश पांडकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहयोग केला

# रोटरी क्लब अचलपूरचा स्तुत्य उपक्रम; १२० महिलांची नि:शुल्क कर्करोग पूर्वतपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१परतवाडा**

सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोटरी क्लब अचलपूर तर्फे महिलांसाठी नि:शुल्क कर्करोग पूर्वतपासणी (मेमोग्राफी) शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. दि. १६ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान स्थानिक गुलाब बाग पेलेस येथे पार पडलेल्या या शिबिरात सुमारे १२० महिलांनी नोंदणी करून तपासणीचा लाभ घेतला.खाजगी रुग्णालयात मेमोग्राफी तपासणीसाठी साधारणतः ८ ते १० हजार रुपये खर्च येतो. मात्र, या शिबिरात ही तपासणी पूर्णपणे नि:शुल्क करण्यात आली, हे विशेष ठरले. या उपक्रमासाठी रोटरी क्लबसोबत रोटरी इनरव्हिल, अग्रवाल समाज तसेच इतर सेवाभावी संस्थांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय उच्च माध्यमिक शाळा आणि जनता सहकारी बँक यांच्या चमूनेही आयोजनात मोलाचे योगदान दिले.शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष गौरव बन्सल, प्रकल्प प्रमुख डॉ. प्रीती खोजरे (वर्मा), रोटे. विवेक लष्करी, इनरव्हिलच्या सौ. शोभा अरुण अग्रवाल, राष्ट्रीय शाळेचे प्राचार्य



सर्वेश राठी, ज्येष्ठ शिक्षक महेश शेरेकर आणि सहाय्यक पर्यवेक्षक दिलीप कुमार बोबडे उपस्थित होते. नूतन नगराध्यक्षा सौ. रुपाली अभय माथने यांनी शिबिराला भेट देत उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. अनेक नगरसेविकांनीही तपासणीसाठी नाव नोंदविल्याने जनजागृतीला सकारात्मक बळ मिळाले.

कर्करोगाचे वेळेवर निदान झाले तर त्यावर यशस्वीपणे मात करता येते. त्यामुळे भीती न बाळगता महिलांनी अशा शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष गौरव बन्सल आणि प्रकल्प प्रमुख डॉ. प्रीती खोजरे यांनी केले.या निस्वार्थ आणि सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, महिलांच्या आरोग्य जनजागृतीसाठी हा आदर्श उपक्रम ठरला आहे.

# होळीनिमित्त मनरेगा मजुरांसाठी तातडीने रु. ६७ कोटी निधी मंजूर

## -रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई** - होळीनिमित्त आदिवासी बांधवांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना तातडीने मजुरी अदा करण्यासाठी ६७ कोटींचा निधी मंजूर केला आहे. सदर निधीची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली असून पुढील दोन ते तीन दिवसांत मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी दिली.



ऋमहात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट, पालघर तसेच इतर आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र शासनाने राज्याच्या १३ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारित १६ कोटी मनुष्यदिवसांच्या बजेटला मान्यता दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होऊन मजुरी वेळेत अदा केली जाईल, असेही मंत्री गोगावले स्पष्ट केले.

# सावळा येथील अवैध सावकारावर गुन्हा दाखल धाडीत कोरे धनादेश, ट्रॅक्टर व अवजारे जप्त

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१अमरावती :** धामणगाव तालुक्यातील सावळा येथे अवैध सावकारी व्यवसाय करणाऱ्या गोपाल प्रभाकरराव टेकाडे याच्याविरुद्ध दत्तापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहकार विभागाच्या पथकाने टाकलेल्या धाडीत कोरे धनादेश, स्टॅम्प पेपर्स तसेच मोठ्या प्रमाणात शेती अवजारे जप्त करण्यात आली होती. पडताळणीत अवैध सावकारी सिद्ध झाल्यानंतर सहकार अधिकाऱ्यांनी तक्रार नोंदविल्याने कारवाईला वेग आला.धामणगाव रेल्वे आणि रायपूर कासारखेड येथील काही शेतकऱ्यांनी गोपाल टेकाडे याच्या सावकारीबाबत जिल्हा उपनिबंधकांकडे लेखी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत डीडीआर शंकर कुंभार यांच्या निर्देशानुसार दोन पथके गठित करण्यात आली. २ जानेवारी २०२६ रोजी स्वाती गुडधे (सहायक निबंधक, मोर्शी) आणि सचिन पतंगे (नांदगाव खंडेश्वर) यांच्या नेतृत्वाखालील पथकांनी टेकाडे यांच्या राहत्या घरावर व शेतशिवारात एकाच वेळी धाड टाकली.धाडीमध्ये २१ कोरे धनादेश, पाच लाखांहून अधिक रकमेचे भरलेले धनादेश, २० हून अधिक कोरे स्टॅम्प पेपर्स तसेच ९६ हून अधिक स्थावर मालमत्तेच्या खरेदीखतांच्या इसारचिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. याशिवाय शेतातील गोठ्यातून ३ ट्रॅक्टर, १ चारचाकी वाहन, ७ पलटी नांगर, ३ रोटावेटर, ५ पेरणी यंत्रे, लोखंडी बंडी व अनेक 'व्ही-पास' यंत्रे जप्त करण्यात आली. शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री आढळून आल्याने पथकाला धक्काच बसला.सहकार विभागाने याप्रकरणी सुनावणी व सखोल पडताळणी केली. त्यात टेकाडे यांच्याकडून अवैध सावकारी व्यवसाय केल्याचे स्पष्ट झाल्याने गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६

शहर/ग्रामिण

# ‘त्या’ ८६५ जणांवर आजपासून गुन्हे दाखल

## किरीट सोमय्या २०२५ मध्ये वितरित ३५ हजार प्रमाणपत्रांचेही होणार ऑडिट

### बोगस जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरण प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती** महानगरपालिका क्षेत्रात जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांच्या वितरणात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे उघड झाले आहे. मनपाकडून वितरित करण्यात आलेल्या ७ हजार १२८ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची छानणी करण्यात आली असता, तब्बल ९६५ जणांनी बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे मिळविल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी १०० जणांविरुद्ध आधीच गुन्हे दाखल करण्यात आले असून उर्वरित ८६५ प्रकरणांमध्ये आजपासून गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती माजी खासदार किरीट सोमय्या यांनी



शुक्रवारी अमरावती येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

पुढील १५ दिवसांत संबंधित सर्व दोषींवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा दावा त्यांनी केला. सोमय्या यांनी पुढे सांगितले की, वर्ष २०२५ मध्ये अमरावती मनपाकडून तब्बल ३५ हजार जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. या प्रमाणपत्रांमध्येही मोठ्या प्रमाणावर बोगसगिरी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यासर्व ३५ हजार प्रमाणपत्रांचे विशेष ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली आहे. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेत पुढील १५ दिवसांत संपूर्ण ऑडिट करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणण्याचे आश्वासन दिल्याचे सोमय्या यांनी सांगितले. याप्रकरणाच्या मुळाशी जाऊन संबंधित अधिकारी व लाभार्थी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### २१ दिवसात नोंदणी बंधनकारक

दरम्यान, जन्म किंवा मृत्यू झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत संबंधित घटनेची अधिकृत नोंदणी करणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. निर्धारित मुदतीत नोंदणी न केल्यास भविष्यात विविध कायदेशीर व प्रशासकीय अडचणी निर्माण होऊ शकतात. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ नुसार, २१ दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केल्यास प्रमाणपत्र विनामूल्य मिळते. विलंब झाल्यास अतिरिक्त शुल्क व दंड आकारला जाऊ शकतो. जन्म प्रमाणपत्र शाळा व महाविद्यालय प्रवेश, आधार कार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, शासकीय योजना व शिष्यवृत्तींसाठी तसेच वयाच्या पुराव्यासाठी अत्यावश्यक असते. तर मृत्यू प्रमाणपत्र वारस नोंदणी, मालमत्ता हस्तांतरण, पेन्शन, विमा दावे, बँक खात्यांचे व्यवहार बंद किंवा हस्तांतरित करण्यासाठी तसेच शासकीय अभिलेख अद्ययावत करण्यासाठी अनिवार्य असते, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी प्रवीण पारीसे यांनी दिली.

# बसपाची अमरावती जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

## संघटनात्मक फेरबदलांची नांदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडविणारा निर्णय घेत बहुजन समाज पार्टीने अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांची संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त केली आहे. यासंदर्भातील अधिकृत आदेश शुक्रवार (दि. २०) रोजी प्रसिद्ध करण्यात आला प्रदेश स्तरावर झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आल्याने पक्षांतर्गत मोठ्या संघटनात्मक बदलांची नांदी मानली जात आहे. मुंबई येथे दि. १७ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत प्रदेशाध्यक्ष अॅड. सुनील डोगरे यांनी राज्यातील काही जिल्ह्यांच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला. संघटन बळकटीकरण, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पक्षाच्या विस्ताराच्या दृष्टीने व्यापक फेररचनेची गरज असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. त्यानुसार अमरावती व यवतमाळ जिल्हा कार्यकारिण्या तत्काळ प्रभावाने बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे.सदर आदेश प्रदेश सचिव तथा जिल्हा प्रभारी राजेंद्र कांबळे यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आला आहे. या निर्णयाची माहिती संबंधित जिल्ह्यांतील सर्व पदाधिकाऱ्यांना देण्यात आली असून, पुढील आदेशापर्यंत संघटनात्मक जबाबदाऱ्या प्रदेश पातळीवरून पाहिल्या जाणार असल्याची चर्चा आहे.कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम, नव्या नेतृत्वाची उत्सुकता : अमरावती व यवतमाळ या दोन्ही जिल्ह्यांमध्ये बसपचा विशिष्ट मतदारवर्ग असून, गेल्या काही वर्षांत संघटनात्मक चढ-उतार दिसून आले होते. त्यामुळे अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे स्थानिक पातळीवर विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. काही पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केल्याची चर्चा असली, तरी अधिकृत स्तरावर मात्र 'संघटन मजबुतीसाठी आवश्यक पाऊल' अशी भूमिका मांडली जात आहे.पक्षातील जाणकारांच्या मते, आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर नव्या चेहऱ्यांना संधी देत संघटन अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न असू शकतो. विशेषतः युवा नेतृत्वाला प्राधान्य देण्याबाबतही चर्चा सुरू आहे. प्रदेश नेतृत्वाकडून इच्छुक पदाधिकाऱ्यांची चाचपणी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते. नव्या नियुक्त्यांमध्ये सामाजिक समतोल, संघटनात्मक निष्ठा आणि आगामी निवडणुकांतील कामगिरी यांचा विचार केला जाणार असल्याचे संकेत आहेत. एकूणच, बसपच्या या निर्णयामुळे अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता असून, नव्या नेतृत्वाच्या घोषणेकडे कार्यकर्ते आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मनपाच्या जन्म-मृत्यू आरोग्य विभागाची उपमुख्य निबंधकांकडून प्रशंसा

## डॉ. बबिता कमलापूरकर यांनी केली पाहणी



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती-**

महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग येथे दि. १८ फेब्रुवारी रोजी जन्म मृत्यू विभागाच्या उपसंचालक तथा उपमुख्य निबंधक महाराष्ट्र राज्य डॉ.बी डी कमलापुरकर यांनी भेट दिली व जन्म मृत्यू विभागाचा आढावा घेतला. तसेच जन्म मृत्यू बद्दल येत असलेल्या अडचणी बद्दलही जाणून घेतले. भेट देताना जिल्हा परिषद आरोग्य विभाग येथील डॉ. रमेश बनसोड व सांख्यिकी तज्ञ अमोल लेंडवे उपस्थित होते व महानगरपालिका - मार्फत आरोग्य विभागाचे डॉ. विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी तसेच डॉ. प्रतिभा आत्राम उपनिबंधक जन्ममृत्यू तसेच जन्म मृत्यू विभागाचे इतर कर्मचारी व डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

आढावा बैठकीत जन्ममृत्यू विभागात काम करताना येणाऱ्या अडचणी बाबत उपसंचालक यांना अवगत केलेले आहे व झोननिहाय उपनिबंधक सुरू करण्याबाबत तांत्रिक अडचणीवर तोडगा काढण्या साठी विनंती करण्यात आली आहे. तसेच काम करताना सॉफ्टवेअर बद्दल ट्रेनिंग घेण्यासाठी आणि त्यात येणाऱ्या अडचणी याबद्दलही अवगत करण्यात आले आहे. तसेच माननीय उपसंचालक यांनी जन्ममृत्यू रेकॉर्ड साठी जागा उपलब्ध करणे, जास्तीत जास्त कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांमार्फत काम करून घेणे, आणि ओटीपी व व पासवर्ड शेअर न करणे तसेच प्रत्येक जिल्हास्तरावर एक तांत्रिक रिसोर्स पर्सन प्रशिक्षित करणे याबद्दल आदेशित केलेले आहे. डॉ. बबिता कमलापूरकर यानी जन्म मृत्यूच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून होत असलेल्या कामाची प्रशंसा केली महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विचार करून सुविधा देण्यासाठी जास्तीत जास्त तांत्रिक मनुष्य बळ वापरून कामात कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी सूचित केले आहे.

# विवेक कलोती यांच्या फेसबुक पोस्टने भाजपमध्ये खळबळ

## स्वीकृत नगरसेवक नियुक्तीनंतर अंतर्गत नाराजी उफाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती : -** महानगरपालिकेच्या आमसभेत स्वीकृत नगरसेवकांची घोषणा होताच शहरातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. भारतीय जनता पक्षाकडून अॅड. प्रशांत देशपांडे आणि संजय तिरथकर यांच्या नावांची स्वीकृत नगरसेवक म्हणून घोषणा करण्यात आली. निवडणुकीदरम्यान दोघांनाही उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यावेळी पक्ष नेतृत्वाकडून त्यांना स्वीकृत पद देण्याचे आश्वासन देण्यात आल्याची चर्चा होती. अखेर पक्षाने शब्द पाळत दोघांची नियुक्ती जाहीर केली.भाजपमध्ये स्वीकृत पदासाठी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने पक्ष नेतृत्वासमोर समतोल राखण्याचे मोठे आव्हान होते. तरीही दिलेले आश्वासन पूर्ण केल्याने काही कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र या निर्णयानंतर पक्षांतर्गत नाराजी पुन्हा डोके वर काढताना दिसत आहे.मागील निवडणुकीत भाजपकडून विवेक कलोती, अविनाश देऊळकर, सुनीता बुरंगे आणि गंगा खारकर यांना उमेदवारी देण्यात आली होती. संबंधित प्रभागात




भाजपचा दारुण पराभव झाला. प्रत्येक उमेदवाराला दोन ते सात हजार मतांनी पराभव स्वीकारावा लागला. विवेक कलोती यांनाही ९२६ मतांनी पराभव पत्करावा लागला होता. त्यावेळी त्यांनी पक्षातील काही निष्ठावंत कार्यकर्त्यांमुळे पराभव झाल्याचा आरोप केला होता.आता स्वीकृत नगरसेवकांच्या घोषणेनंतर विवेक कलोती यांनी फेसबुक पोस्टद्वारे आपल्या मनातील खदखद व्यक्त केल्याची चर्चा आहे. उमेदवारी न मिळाल्यावर घरात बसणारे किंवा पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात काम करणाऱ्यांना बक्षीस दिले जात असल्याचा सूचक उल्लेख त्यांनी केल्याचे बोलले जात आहे. या पोस्टमुळे पक्षातील अंतर्गत मतभेद पुन्हा उफाळून आल्याचे दिसते. एकूणच, स्वीकृत नगरसेवकाच्या नियुक्तीनंतर शहरातील राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात भाजप मधील अंतर्गत समीकरणांमध्ये काय बदल होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जन्म-मृत्यूची २१ दिवसात नोंद करणे बंधनकारक

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** जन्म किंवा मृत्यूची घटना घडल्यापासून २१ दिवसांच्या आत त्याची अधिकृत नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास भविष्यात अनेक कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी माहिती आरोग्य विभागामार्फत देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी नागरिकांना ही प्रक्रिया गांभीर्याने पेण्याचे आवाहन केले आहे.

शासन निर्णय आणि जन्म-त्यू नोंदणी अधिनियम १९६९ सार, २१ दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केल्यास प्रमाणपत्र मोफत मिळते. यामुळे नागरिकांना विनाकारण विलंब शुल्क किंवा दंडाचा भुर्दंड सोसावा लागणार नाही. ही कटकट टाळण्यासाठी जन्म किंवा मृत्यूची घटना घडताच संबंधित अधिकृत नोंदणी केंद्रात तातडीने संपर्क साधावा.

# दोन माजी महापौरांच्या खांद्यावर आता सभागृहाची जबाबदारी

## सभागृह नेते चेतन गावंडे तर विरोधी पक्षनेते विलास इंगोले

### मनपाच्या पहिल्या आमसभेत घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१अमरावती,**

अमरावती महानगरपालिकेच्या पहिल्या आमसभेत सभागृह नेते म्हणून भाजपाचे गटनेता चेतन गावंडे यांची तर विरोधी पक्षनेतेपदी कॉंग्रेस गटनेता विलास इंगोले यांची घोषणा करण्यात आली. विशेष म्हणजे दोन्ही पदाधिकारी हे माजी महापौर असून त्यांच्या खांद्यावर आता पुन्हा एकदा या दोन्ही महत्वाच्या पदाच्या रुपाने सभागृहाची जबाबदारी आली आहे.

महानगरपालिकेची पहिली आमसभा शुक्रवारी (२०) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आमसभेची कार्यवाही सुरु झाली. यावेळी कार्यसुचीनुसार स्विकृत सदस्य, स्थायी समिती सदस्यांच्या निवडीसह सभागृह नेता, तसेच विरोधी पक्षनेत्याची घोषणा करण्यात आली. २५ नगरसेवक निवडून आल्यामुळे भाजप महापालिकेतील सर्वात मोठा गट आहे. भाजपसोबत मित्रपक्ष वायएसपीचे





१५, राकॉंचे ११ असे एकूण ५१ नगरसेक या गटामध्ये आहेत.त्यामुळे भाजपचे गट नेता चेतन गावंडे यांना सभागृह नेते म्हणून घोषीत करण्यात आले. तर कॉंग्रेसचे १५ व वंचित बहुजन आघाडीचे १ अशा १६ नगरसेवकांच्या दुसऱ्या मोठ्या गटाचे नेतृत्व करीत असलेल्या विलास इंगोले यांची विरोधीपक्षनेते पदी घोषणा करण्यात आली. या घोषणेनंतर चेतन गावंडे आणि विलास इंगोले यांचे सर्वांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यात रविवारी शिष्यवृत्ती परीक्षा; २९ हजार विद्यार्थी देणार परीक्षा, प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती** जिल्हा परिषद अमरावतीच्या शिक्षण विभागामार्फत (प्राथमिक) पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यात एकूण २२५ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली असून, सुमारे २९ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.या परीक्षेच्या नियोजनाबाबत अधिक माहिती देताना शिक्षण विभागाने कळविले आहे की, इयत्ता ५ वी साठी जिल्ह्यात १३४ केंद्रे निर्धारित करण्यात आली असून तेथे १८,४४७ परीक्षार्थी परीक्षा देतील. तसेच, इयत्ता ८ वी साठी ९१ परीक्षा



केंद्रे असून तेथे १०,५५१ परीक्षार्थी आपली क्षमता सिद्ध करतील. संपूर्ण जिल्ह्यात एकूण २२५ केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे.परीक्षेच्या पारदर्शक आणि सुरळीत संचालनासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रावर एक केंद्र संचालक एकूण २२५ आणि १ हजार ४३९ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर २ भरारी पथके आणि प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र एक पथक कार्यान्वित करण्यात आले आहे.

# थकीत कर वसुलीसाठी अमरावती महानगरपालिका-मजीप्राचा ऐतिहासिक करार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती**

शहरातील थकीत महसूल वसुलीला गती देण्यासाठी अमरावती महानगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) यांच्यात महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. अमरावती शहरात पाणीपुरवठा व्यवस्था पाहणारी एजन्सी म्हणून मजीप्रा कार्यरत असून, त्यानुसार महसूल वसुली प्रभावी करण्यासाठी हा संयुक्त उपक्रम राबविण्यात येत आहे.महानगरपालिकेकडे मालमत्ता कराची तर मजीप्राकडे पाणीपट्टीची मोठ्या प्रमाणात थकबाकी प्रलंबित आहे. या अवाढव्य थकबाकीच्या प्रभावी



वसुलीसाठी दोन्ही संस्थांनी संयुक्त कारवाईचे धोरण निश्चित केले आहे. करारानुसार, कोणतीही नागरी सेवा घेण्यासाठी संबंधित नागरिकांनी दुसऱ्या विभागाचे ‘ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. मालमत्ता कर थकीत असल्यास मजीप्रा सेवा देणार नाही, तर पाणीपट्टी थकीत असल्यास महानगरपालिका सेवा रोखू शकते. तसेच मालमत्ता कर थकविणाऱ्या नागरिकांचा पाणीपुरवठा खंडित करण्यासाठी मजीप्रा थेट सहकार्य करेल. संबंधित झोन अधिकाऱ्याचे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ मिळाल्या शिवाय पाणीपुरवठा पुन्हा सुरू केला जाणार नाही.शहरातील अवैध नळजोडण्या आणि कर न आकारलेल्या मालमत्ता शोधण्यासाठी संयुक्त डिजिटल डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. कर किंवा पाणीपट्टी न भरणाऱ्यांविरुद्ध दोन्ही संस्था संयुक्तपणे कायदेशीर जप्ती व वसुली कारवाई करतील. महसूल वाढविणे, थकबाकी कमी करणे आणि सेवा वितरणात शिस्त आणणे या उद्देशाने करण्यात आलेला हा संयुक्त करार शहर प्रशासनासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.प्रशासनाने नागरिकांना तातडीने थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरण्याचे आवाहन केले आहे.

# ई-गव्हर्नन्समध्ये अमरावती महापालिका राज्यात चौथी

## आमसभेत मनपा प्रशासनाचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

भारत सरकार व राज्य सरकारच्या ई-गव्हर्नन्स धोरणांच्या अनुषंगाने तसेच युनाइटेड नेशनच्या ई-गव्हर्नन्स अहवालातील निकषांचा अभ्यास करून दरवर्षी ई-गव्हर्नन्स निर्देशांक निश्चित केला जातो. यावर्षी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सर्वेक्षणात अमरावती महानगरपालिकेने राज्यात चौथा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नवी मुंबई, पुणे, कोल्हापूरनंतर चौथा क्रमांक अमरावती महानगरपालिकेने मिळवला आहे. विशेष म्हणजे मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर यांच्यासारख्या मोठ्या महानगरपालिका ज्यांचे ई-गव्हर्नन्स व डिजिटायझेशनचे बजेट ३०० करोड पेक्षा जास्त आहे, अशाही महानगरपालिके



ला मागे टाकत अमरावती महानगरपालिकेने ही कामगिरी साध्य केली आहे.

हा निर्देशांक पॉलिसी रिसर्च ऑरगनायझेशन (पीआरओ) तर्फे महानगरपालिकांच्या ई-गव्हर्नन्सच्या सद्यस्थितीचा सखोल अभ्यास करून तयार करण्यात आला आहे. सेवा वितरण, पारदर्शकता, नागरिकांसाठी उपलब्धता, ई-गव्हर्नन्स मोबाईल ॲप, सोशल मीडिया वापर आणि अधिकृत संकेतस्थळावरील माहिती या निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. या यशाबद्दल महानगरपालिकेच्या पहिल्या आमसभेत महापौर श्रीचंद तेजवानी व उपमहापौर सचिन भेंडे तसेच सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, युवा स्वाभिमान पक्षाचे गटनेते नाना आमले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते अविनाश मार्डीकर, गटनेते राजेंद्र तायडे, एमआयएम गटनेते शेख हमीद आणि प्रशांत वानखडे यांनी आयुक्त सौम्या शर्मा व सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व संगणक विभागातील संपूर्ण चमुचे या उल्लेखनीय कामगिरी बाबत अभिनंदन केले. नागरिकांना आवश्यक असलेल्या सेवा पारदर्शनीपणे ऑनलाईन पद्धतीने पुढेही देण्यासाठी मनपा प्रयत्न करत राहील असा विश्वासही मनपा आयुक्त यांनी व्यक्त केला. नागरिकांना ई-गव्हर्नन्स मधील प्रगती व सुधारणा यांची माहिती पॉलिसी रिसर्च तसेच महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, ती डाउनलोडही करता येणार आहे.

# शुल्कमुक्त आयात धोरणाचा शेतकऱ्यांना जबर फटका !

## म्यानमारची 'लेमन' भारतीय तुरीला खाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

म्यानमारच्या 'लेमन' तुरीचा हंगाम सुरू झाला आहे. भारतीय व्यापाऱ्यांनी या तूर आयातीचे जानेवारीमध्येच सौदे केले होते. ती तूर फेब्रुवारीमध्ये आयात होणार असल्याने देशांतर्गत बाजारातील भारतीय तुरीचे दर प्रतिक्विंटल एक हजार ते १,२०० रुपयांनी कोसळले आहेत. केंद्र सरकारच्या डाळवर्गीय पिकांच्या शुल्कमुक्त आयात धोरणाचा फटका भारतीय तूर उत्पादकांना बसत असून, आगामी दोन महिने तुरीच्या दरात तेजी येण्याची शक्यता मावळली आहे.

सरकारने यावर्षी तुरीची एमएसपी प्रतिक्विंटल आठ हजार रुपये जाहीर केली असली तरी १ डिसेंबर २०२५ ते २० जानेवारी २०२६ या काळात देशांतर्गत बाजारपेठांमध्ये तुरीचे दर एमएसपीच्या खाली म्हणजेच प्रतिक्विंटल ६,२०० ते ७,३५० रुपये होते. २० जानेवारीपासून बाजारात तुरीची आवक वाढण्यासोबतच दराने आठ हजार रुपयांचा टप्पा ओलांडला. फेब्रुवारीनंतर ७,५०० ते ८,५०० रुपये आणि १० फेब्रुवारीनंतर ते ७,५०० ते ८,२०० रुपये राहिले. याच काळात उत्तम प्रतीच्या तुरीचे दर नऊ हजार रुपयांपर्यंत पोहोचले होते.

दरातील ही तेजी बड्या



दालमिलांच्या तुलनेत छोट्या दालमिल मालकांनी मोठ्या प्रमाणात तूर खरेदी केल्याने निर्माण झाली होती. याच काळात बड्यांनी म्यानमारमधील व्यापाऱ्यांशी लेमन तूर आयातीचे सौदे केले. ते पूर्ण होताच त्यांनी तूर खरेदीचे प्रमाण कमी करीत दर नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू केले. यात त्यांना यश आल्याने तुरीचे दर पुन्हा एमएसपीच्या खाली आले.

**किती तूर आयात होणार?**

नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या काळात म्यानमारमधून १९,३०० टन तर टांझानिया व मोझांबिकमधून ८०,७०० टन तूर आयात करण्यात आली. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या काळात ६.१७ लाख टन आयात केली. केंद्र सरकारने जानेवारीमध्ये ४ लाख टन तूर आयातीला दिली आहे. त्यामुळे म्यानमारमधून २ लाख टन, मोझांबिकमधून ४० हजार टन, टांझानिया व मलावी या दोन देशांमधून २५ हजार टन अशी एकूण २.६५ लाख टन तूर मार्चपर्यंत आयात केली जाणार आहे.

**सरकारची तुटपुंजी खरेदी**

केंद्र सरकारने एमएसपी दराने १३.२२ लाख टन तूर खरेदीचे उद्दिष्ट ठेवले होते. यात महाराष्ट्रात ३.३७ लाख टन, कर्नाटक ९.६७लाख टन आणि इतर सात राज्यांमध्ये १८ हजार टन तूर खरेद करण्याचे जाहीर केले होते. वास्तवात, या नऊ राज्यांमध्ये सरकारने १८ फेबुवारीपर्यंत केवळ ३.९२ लाख टन तूर खरेदी केली. नोंदणी प्रक्रिया, नाफेड व एनसीसीएफचा खरेदीचा वेग व तांत्रिक बाबी विचारात घेता सरकार देशभरात पाच लाख टनांपेक्षा अधिक तूर एमएसपी दराने खरेदी करणार नाही.

# शेतात बांधलेली जनावरे चोरणारे दोघे जेरबंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शेतात बांधलेली जनावरे चोरणाऱ्या टोळीतील दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले वाहन, मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ३ लाख ३२ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरिश असलम पठाण (वय २१ रा. आमनेर, ता. वरुड) आणि चेतन विनोद वानखडे (वय २५ रा. धनोडी. ता. वरुड) अशी अटकेतील जनावरे चोरट्यांची नावे आहेत.वरुड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बेसखेडा येथील रहिवाशी कृष्णाजी गुणवंत यावले (वय ६५) यानी त्यांची पाच जनावरे रात्रीला शेतात बांधून ठेवले होते. १५ जानेवारी रोजी सकाळी ते शेतात गेले असता त्यांना बांधून ठेवलेल्या तीन गाई चोरी झालेल्या दिसताच त्यांनीवरुड पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोट्ट्यांचा शोध सुरु केला. तसेच गुन्हे शाखेचे पथक सुध्दा समांतर तपास करीत होते. दरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाला आरिश पठाणने जनावरे चोरी केले असून तो सध्या वरुड गावात त्याचे वाहन दुरुस्तीकरा आला आहे, अशी माहिती मिळताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याची कसुन चौकशी केली. तेव्हा तीन साथिदारांच्या मदतीने गुन्हा केल्याचे त्याने कबुल केले. त्यानंतर पोलिसांनी चेतन वानखडेला अटक करून गुन्ह्यात वापरलेले वाहन, दोन मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ३ लाख ३२ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन वरुड पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली.

# अंजनसिंगीत आंबा मोहोराची लाट

## १० टक्के झाडांवर भरघोस बहर

## उत्पादनाच्या आशा वाढल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनसिंगी**



अनुकूल वातावरण आणि थंडीतून मिळालेल्या पोषक हवामानामुळे अंजनसिंगी परिसरात आंबा मोहोराने अक्षरशः झाडे लदबदली आहेत. अनेक बागांमध्ये पानांपेक्षा मोहोरच अधिक दिसत असून सुमारे ९० टक्क्यांहून अधिक आंब्याच्या झाडांवर यंदा भरघोस बहर आल्याचे चित्र आहे. त्यामुळे गावरान आंब्याच्या चांगल्या उत्पादनाची आशा निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत आहे. धामण गाव तालुक्यातील अंजनसिंगी, अंजनवती, ढाकुलगाव तसेच तिवसा तालुक्यातील दुर्गवाडा व धारवडा परिसरात गावरान आंब्याच्या बागा मोठ्या प्रमाणावर आहेत. नैसर्गिक चव, सुगंध आणि टिकाऊपणा यामुळे येथील आंब्याला बाजारात विशेष मागणी असते. काही बागांतील झाडे नुकतीच लागवड केलेली असली तरी अनेक झाडे ४० ते ५० वर्षांपूर्वीची असून आजही ती भरघोस उत्पादन देत आहेत.अंजनसिंगी येथील शेतकरी राहुल ठाकरे यांनी सांगितले की, आमच्या शेतात लहान-मोठी मिळून जवळपास २५० केसर आंब्याची झाडे आहेत. यंदा बहुतांश झाडांवर भरघोस मोहोर आला आहे. निसर्गाने साथ दिली आणि अवकाळी पावसाचा फटका बसला नाही, तर आंब्यापासून चांगले उत्पन्न मिळेल, अशी अपेक्षा आहे.यंदा लहान तसेच मोठ्या झाडांनाही मोहोराचे प्रमाण अधिक असल्याने उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या बागायतदार झाडांची निगा राखणे, कीडरोग नियंत्रण आणि फळधारणा टिकवण्यासाठी आवश्यक फवारणी यावर भर देत आहेत.एकूणच, अंजनसिंगी परिसरात आंबा मोहोराची लाट उसळली असून, हवामानाची साथ कायम राहिल्यास यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# 'लव्ह जिहाद' आणि सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा करा

## हिंदु जनजागृति समितिचे निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राज्यातील अनेक भागांत ' लव्ह जिहाद', फसवणूक करून केलेले विवाह, ओळख लपवून संबंध प्रस्थापित करणे, मानसिक दबाव, फसवणूक किंवा धमकीद्वारे धर्मांतर केल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा कायदा नसल्याने कठोर कारवाई करता येत नाही.त्याकारणाने केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार देशातील ५ राज्यांत लागू झालेला, तसेच महाराष्ट्र शासनाने तत्त्वतः मान्यता दिलेला ' *लव्ह जिहाद'* आणि बलपुर्वक धर्मांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा येणार्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात यावा, या मागणीसाठी हिंदु जनजागृति समिति व समस्त हिंदुत्ववादीसंघटनांच्या वतीने शासनाला जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक तथा तहसीलदार डॉ.निलेश खटके यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. या प्रसंगी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.याच मागणीसाठी हिंदू जनजागृती समिती व समस्त हिंदुत्ववादी संघटनाच्या वतीने राज्यात ठिकठिकाणी निवेदने देण्यात येत आहे.

*उपस्थित मान्यवर*

या प्रसंगी सौ.रंजना पांडेसौ.उषा कांबळेसौ.लिना नांदुरकरसौ. भारती मोहोडश्रीमती विभा चौधरीसौ.चंदा बागडेसौ. समिधा वरुडकरसौ.लता कुयरेसौ. बेला चव्हाणसौ.किरण कोमेरवारसौ.संगीता चौधरीसौ.रेखा मालपानीसौ. प्रीती नागपुरेसौ.कंचन शर्माश्री.सचिन वैद्यश्री. गिरीष जामोदेश्री .पप्पू मिश्रा (धर्मजागरण)श्री. हरीश नाडे (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान)श्री रमेश वरुडकर यांसह मोठ्या संख्येने महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

# १४ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीला स्थगिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती :**

ग्रामविकास विभागाच्या अवर सचिवांनी २३ जानेवारी रोजी जारी केलेल्या पत्रान्वये काही ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याच्या सूचनांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. अचलपूर तालुक्यातील कांडली येथील सरपंच तसेच धामणगाव तालुक्यातील १३ पदाधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या रिट याचिकांवर सुनावणी करत न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत कोणतीही कारवाई न करण्याचे निर्देश दिले.कांडली ग्रामपंचायतीसह दाभाडा, ढाकुलगाव, विरुळ रोंघे, वाठोडा, जुना धामणगाव, झाडा, हिरपूर, बोरगाव निस्ताने, तळेगाव दशासर, अशोकनगर,

## नागपूर खंडपीठाचा शासनाला नोटीस

जळका पटाचे, मंगरुळ दस्तगीर आणि सावळा या ग्रामपंचायतींमधील एकूण १४ पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. या याचिकांवर दोन दिवसांपूर्वी कांडली प्रकरणी, तर २० फेब्रुवारी रोजी धामणगाव



तालुक्यातील १३ पदाधिकाऱ्यांच्या याचिकेवर सुनावणी झाली. पुढील सुनावणी २४ फेब्रुवारीला होणार असून शासनाला नोटीस बजावण्यात आली आहे.यापूर्वी अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातील अशाच स्वरूपाच्या प्रकरणांमध्येही न्यायालयाने याचिका एकत्रित करून सुनावणी घेतली होती. सद्यप्रकरणातही सर्व याचिका एकत्रितपणे विचाराधीन आहेत.याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. नीलेश गावंडे यांनी बाजू मांडताना संविधानाच्या कलम २४३(ई) नुसार ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर तातडीने सार्वत्रिक निवडणुका घोषित करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यमान सरपंचांनाच कारभार सांभाळू देण्याची मागणीही त्यांनी न्यायालयासमोर केली.न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठाने शासनाच्या २३ जानेवारीच्या आदेशावर पुढील सुनावणीपर्यंत कार्यवाही न करण्याचे आदेश दिले. त्यामुळे संबंधित १४ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीला तात्पुरता ब्रेक लागला आहे.या निर्णयामुळे जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात हालचालींना वेग आला असून, पुढील सुनावणीत न्यायालय कोणता निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिरेमाळी समाज बहुउद्देशीय संस्थाची सिंहावलोकन बैठक व शिवजयंती उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती :** जिरेमाळी समाज बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्या वतीने आयोजित वधुवर परिचय मेळावा २०२५ च्या 'सिंहावलोकन आढावा बैठकी'चा कार्यक्रम पिंपळखुटा येथे श्री अविनाश भोजापुरे यांच्या शेतात उत्साहात पार पडला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अकोट येथील प्रसिद्ध उद्योगपती ज्ञानदेवराव चवाळे होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. तसेच महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, संत सावता माळी आणि संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.संस्थेचा वधुवर परिचय मेळावा दरवर्षी ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने घेतला जातो.

डिजिटल माध्यमांचा वापर केल्यामुळे खर्चात बचत होत असून देशभरातील समाजबांधवांना सहभागी होता येते. या उपक्रमामुळे अनेक मुला-मुलींना योग्य जोडीदार मिळण्यास मदत झाली असून समाजसंघटन अधिक बळकट झाले आहे.शिवजयंतीनिमित्त विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन सौ. क्षितिजाताई पंकज लायबर व सौ. स्वाती कपिल नांदगावकर यांच्या नियोजनात करण्यात आले. हौजी गेम, पासिंग द बॉल, संगीत खुर्ची व उखाणे अशा स्पर्धांत सर्व वयोगटातील महिला-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.संस्थेचे सचिव पंकज सपकाळ यांनी मेळाव्याचा जमा-खर्चाचा तपशील सादर केला.

सर्व खर्च वजा जाता यावर्षी संस्थेकडे ७३ हजार रुपयांची बचत शिल्लक राहिल्याची माहिती देण्यात आली. काटकसरी व डिजिटल पद्धतीने मेळावा यशस्वी केल्याबद्दल कार्यकारिणी व आयोजन समितीचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रमोद लोमटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विविध मान्यवर, समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश भोजापुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन पंकज सपकाळ यांनी केले.या बैठकीत भविष्यात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून समाजाचे संघटन अधिक मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला.

# विश्वकल्याणाची भावना हिंदू समाजातच- अतुल मोघे

## तिवस्यात सकल हिंदू संमेलन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१ तिवसा**

संपूर्ण जगाचे व विश्वाचे कल्याण व्हावे, अशी व्यापक व सर्वसमावेशक भावना जर कोणाच्या मनात असेल, तर ती हिंदू समाजाच्या मनात आहे, असे प्रतिपादन , राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुली मोघे यांनी केले. येथील समर्थ लॉन येथे आयोजित सकल हिंदू संमेलनात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या भव्य व प्रेरणादायी संमेलनाला विविध क्षेत्रातील संत, मान्यवर व हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री जनार्दन बोथे होते. संत म्हणून माहेश्वरी दीदी, देवराजजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. अतुल मोघे यांनी हिंदू संस्कृतीची वैश्विकता, सहिष्णुता व सर्वांगीण कल्याणाची परंपरा अधोरेखित केली. हिंदू समाज हा केवळ स्वतःच्या नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा




विचार करणारा समाज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिंदू समाजाने आपल्या परंपरा, संस्कार व संघटनशक्ती अधिक बळकट करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी परमेश्वरी शेलोटकर व ज्योती शेलोटकर यांनी सादर केलेल्या शौर्य प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणातून हिंदू समाजातील शौर्य, आत्मविश्वास व संस्कारांचे प्रभावी दर्शन घडले. मार्गदर्शन करताना माहेश्वरी दीदी यांनी हिंदूंचे आचार-विचार, संस्कृती, परंपरा व संस्कार यांचे महत्त्व विशद केले. सध्याच्या काळात पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढत असून हिंदूंनी आपल्या मूळ संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी सजग राहावे, असे आवाहन त्यांनी केले. संमेलनाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार यश खाजबागे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी तालुका सहकार्यवाह भूषण आमले, तालुका बौद्धिक प्रमुख मिलिंद डेहनकर, आयोजन समितीचे संयोजक अजय गुल्हाने, सहसंयोजक सुमित अनासने तसेच मोठ्या संख्येने हिंदू बांधवांनी परिश्रम घेतले.

# दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सीएनजी सेवेचा शुभारंभ

## सहकार क्षेत्राला चालना; पर्यावरणपूरक ऊर्जेचा नवा अध्याय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१दर्यापूर**

कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर ही राज्यातील अग्रेसर बाजार समित्यांपैकी एक असून विदर्भात तिचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन जिल्हा सहायक निबंधक शंकर कुंभार यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बाजार समितीच्या पेट्रोल पंपावर सीएनजी सेवेच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती सुनील पाटील गावंडे होते. उद्घाटन खा. बळवंत वानखडे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे, सहकार नेते ॲड. बाळासाहेब ऊर्फ श्रीरंग पाटील, सहायक निबंधक किशोर बलिंगे, प्रभारी सचिव अंकिता गणेकर तसेच सीएनजी प्रकल्प प्रमुख पारधी उपस्थित होते.या उपक्रमामुळे सहकार क्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापराला चालना मिळेल, असे मत सभापती सुनील पाटील गावंडे यांनी व्यक्त केले. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमास उपसभापती श्रीकृष्ण पाटील कराळे, संचालक साहेबराव भदे, राजेंद्र पाटील वढाळ, राजेश खेडकर, मनीष कोरपे, प्रभाकर पाटील, डॉ. अभय गावंडे, भारत आठवले, राजेश राठी, अनिल भारसाकळे, असिफ खान, दिनकर गायगोले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि किफायतशीर

इंधन म्हणून सीएनजीचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. दर्यापूरमध्ये ही सेवा उपलब्ध होत असल्याने वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार असून शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना याचा थेट लाभ होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पावन पर्वावर सुरू होणारा हा विकासात्मक उपक्रम सहकार क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देत आधुनिक सुविधांकडे वाटचाल करण्याचा हा ठोस प्रयत्न असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# अंजनगाव तहसील विभागाने तक्रार निवारण उपक्रमात मारली बाजी

## तालुक्यातील इतर विभागाला तक्रारींचे निवारण करण्यात आले अपयश महसूल विभागाने ७३ तक्रारी पैकी १० तक्रारी जागेवरच काढल्या निकाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम अंजनगाव सुर्जी येथे १८ फेब्रुवारी बुधवार रोजी तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.




जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम हा प्रशासनाला थेट जनतेशी जोडून, वैयक्तिक व सार्वजनिक समस्यांचे निराकरण करणे तसेच रखडलेल्या विकासकामाचे तालुक्याच्या पातळीवरच तात्काळ निराकरण करण्यासाठी आयोजित केला होता.

या उपक्रमात तालुक्यातील वेगवेगळ्या प्रशासकीय विभागातील १२३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी १० तक्रारी तहसील विभागाच्या संबंधित होत्या त्यामुळे त्या तक्रारी तहसील विभागाने जागेवरच निकाली काढण्यात आल्या तर इतर प्रलंबित तक्रारी ११३ राहिल्या असून संबंधित विभागाकडे २१ दिवसांच्या आत तक्रारीचे निराकरण करण्याच्या सूचना तहसीलदारांनी दिल्या आहे.

अंजनगाव तालुक्यातील जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात ग्रामविकास विभागाशी संबंधित १८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी १८ ही तक्रारी प्रलंबित आहेत, तर कृषी विभागाच्या ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४ ही प्रलंबित आहेत. भुमी अभिलेख विभागाच्या ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४ ही प्रलंबित आहेत, सहा निबंधक संस्था विभागाची १ तक्रार प्राप्त असून तेही प्रलंबित आहे, नगरपरिषद विभागाच्या ३ तक्रारी प्राप्त झाल्या असून तीनही प्रलंबित आहे, वीज वितरण कंपनीच्या २ तक्रारी प्राप्त झाल्या असून दोन्ही तक्रारी प्रलंबित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५ तक्रारी प्राप्त झाल्या असून ५ ही प्रलंबित आहेत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या ६ तक्रारी प्राप्त असून सहाही प्रलंबित आहेत. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या २ तक्रारी प्राप्त असून दोन्ही प्रलंबित आहे. मृद व जलसंधारण विभागाची १ तर ग्रामीण रुग्णालयाची १ असून त्याही प्रलंबित आहेत.नागरिकांच्या प्रलंबित असलेल्या ११३ तक्रारी २१ दिवसांच्या आत निराकरण करून तक्रारदारांना माहिती देण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना तहसीलदारांनी संबंधित विभागांना देण्यात आल्या आहे.महसूल विभागाच्या ७६ तक्रारी पैकी १० तक्रारी जागेवरच निवारण करुन निकाली काढल्या मुळे तालुक्यातील सर्वच प्रशासकीय विभागा पैकी महसूल विभागाने नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात बाजी मारली आहे तर पंचायत समिती विभागाने नागरिकांच्या १८ पैकी एकाही तक्रारींचे निवारण न केल्यामुळे तक्रारदार नागरिकांकडून पंचायत समिती प्रशासना बाबत नाराजी व्यक्त केली आहे.

# शेतीअवजारे चोरी प्रकरणातील एक आरोपी गजाआड

## ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त: एक फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी**

शेती अवजारे चोरून नेणाऱ्या एका आरोपीस पोलिसांनी अटक केली असून ही कारवाई पोलिसांनी जवळा बु. येथे केली आहे. या प्रकरणातील एक आरोपी फरार आहेबोराळा येथील शेतकरी विशाल अरुणलाल चिकटे (३८)यांच्या शेतातून अज्ञात चोरट्याने लोखंडी नांगरटी, ट्रॅक्टर चोरून नेला होता. या घटनेची तक्रार त्यांनी अंजनगाव पोलिसस्टेशनला दिली असता पोलिसांनी गुन्हे दाखल करून तपास सुरु केला होता. या गुन्ह्यातील आरोपीच्या शोधासाठी पोलिस निरीक्षक सूरज बोंडे यांनी डी. बी. पथकाला प्राथमिक तपासकामी रखाना केले असता आरोपी प्रशांत विनोद इंगोले (२६) रा.



जवळा बु. याला अटक केली असूनधीरज गिरीरा जवळाबु, हा फरार झाला असून त्याचा शोध सुरु आहे.आरोपी प्रशांत विनोद इंगोले याला अटक करून त्याच्या ताब्यातून गुन्हधातील चोरी गेलेला थोरात कपनीचा नांगर कि. अं ४० हजार रुपये व काळसर रंगाचा ट्रॅक्टर मुडा कि अ.४ लाख रुपयेव एक मोबाईल फोन कि.अ. १० हजार रुपये असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आलायांच्या आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक पो. नि. सूरज बोंडे ठाणेदार, पोलिस उपनिक्षक भारत चिरहे, पो. अंमलदार जयसिंग चव्हाण, रवी राठोड, अमित घाटे, आकाश रंगारी, शुभम मारकंड व मोहसीन खान पठाण यांनी केली.

# उद्यापासून जळगाव आर्वी संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभसात दिवस भागवत,कीर्तन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धामणगाव रेल्वे**


विदर्भातील प्रत्येकाच्या हृदयात वसलेले संत परमहंस लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला जळगाव आर्वी येथे उद्या रविवार पासून सुरुवात होणार असून सात दिवस भागवत, कीर्तनाचे आयोजन केले आहेदरवर्षी जळगाव आर्वी येथे संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात येतो. उद्या रविवार ला सकाळी १० वाजता संत लहरी बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व कलश स्थापना नगराध्यक्ष अर्चना अडसड – रोठे यांच्या हस्ते न प बांधकाम सभापती मंजिरी अतुल भोगे यांच्या उपस्थितीत होईल.

दररोज सात दिवस भागवताचार्या पूर्णाताई कुलकर्णी यांचे संगीतमय भागवत राहणार आहे. ह भ प संजय गजबे महाराज, ह भ प बाल कीर्तनकार समृद्धी इंगळे ,ह भ प , विलास कोरडे महाराज,ह भ प शिवाणीताई घोंगडे, ह.भ.प. अक्षयनंद हरणे यांचे दररोज रात्री कीर्तन राहणार आहे. सकाळी ग्रामसफाई गावकरी भजन मंडळाच्या वतीने काकडा हरिपाठ व सामुदायिक प्रार्थना राहणार आहे शनीवारी २८ फेब्रुवारी रोजी होम पूजा तर काल्याचे कीर्तन पूर्णाताई कुलकर्णी

यांचे राहणार आहे यावेळी मुरलीधर वर्मा अर्चना वानखडे यांची उपस्थिती राहणार आहे याच दिवशी सायंकाळी दिंडी महोत्सव आयोजीत केला असून यात विदर्भातील नामवंत दिंड्या सहभागी होणार आहे या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संत लहरी बाबा संस्थान व ग्रामस्थांनी केले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय येथे जटिल किडनी प्रत्यारोपण यशस्वी

## आईने दिले मुलाला जीवनदान; महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

मोशी रोडवरील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे आणखी एक जटिल किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. अमरावतीतील महात्मा फुले नगर, नवसारी येथील ३४ वर्षीय सागर प्रभाकर वसुकर यांना त्यांच्या ५५ वर्षीय आई संध्या प्रभाकर वसुकर यांनी किडनी दान करून नवजीवन दिले. सागर हे व्यवसायाने बिछायत केंद्राचे संचालक असून त्यांच्या वडिलांचा ऑटोचालक व्यवसाय आहे.गेल्या सहा महिन्यांपासून सागर यांच्यावर नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. अविनाश चौधरी यांच्या देखरेखीखाली डायलिसिस सुरू होते. किडनी प्रत्यारोपण हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे समुपदेशनानंतर ठरविण्यात आले. त्यानुसार सर्व वैद्यकीय तपासण्या, नातेवाईकांचे समुपदेशन, पोलिस पडताळणी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून प्राधिकरण समितीकडून मान्यता घेण्यात आली. या सर्व प्रक्रियेत ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे व डॉ. सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. युरोलॉजिस्ट डॉ. राहुल पोटोडे व डॉ. विक्रम देशमुख यांच्या नेतृत्वाखालील तज्ञ डॉक्टरांच्या चमूने सुमारे पाच तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. भूलतज्ज्ञ, नेफ्रॉलॉजिस्ट तसेच परिचारिका व तांत्रिक कर्मचाऱ्यांनीही महत्त्वाचे योगदान दिले.ही अत्यंत खर्चिक शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली. शस्त्रक्रियेपूर्वीच्या अनेक तपासण्या देखील रुग्णालयात विनामूल्य करण्यात आल्याने कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती समाधानकारक असून पुढील काही दिवस अतिदक्षता विभागात निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार आहे.किडनी प्रत्यारोपणासारखी अवघड शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्रशासन आणि संपूर्ण वैद्यकीय चमूचे सर्वत्र कौतुक होत आहे. आईच्या त्यागामुळे आणि डॉक्टरांच्या कौशल्यामुळे एका कुटुंबाला नवसंजीवनी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# वडाळी प्रभागात जीर्ण वीजखांबांचा मृत्यूचा सापळा; तातडीने बदलाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

वडाळी प्रभागातील विविध भागांमध्ये उभे असलेले जीर्ण व धोकादायक वीजखांब नागरिकांच्या जीवितास धोका ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. भाजप शहर जिल्हा सचिव तथा नगरसेविका पंचफुला संजय चव्हाण यांनी यासंदर्भात महावितरण कडे तात्काळ कारवाईची मागणी करत कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन सादर केले आहे.निवेदनानुसार, एसआरपीएफ वडाळी भाग क्रमांक ६ मधील देवीनगर माता मंदिरामागे विजय चिखलवार यांच्या घरासमोरील सिमेंट वीजखांब अत्यंत जीर्ण अवस्थेत असून तो कधीही कोसळू शकतो. तसेच डिव्हे यांच्या निधी-साधी अपार्टमेंटसमोरील वडाळी नाक्याजवळील सिमेंट पोल वाकलेला असून तो रस्त्यालगत असल्याने वाहतुकीस गंभीर धोका निर्माण झाला आहे. परिसरात सतत वर्दळ आणि लहान मुलांची उपस्थिती असल्याने संभाव्य अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.भारत नगर, वडाळी येथे शिवदास गायकवाड यांच्या किराणा दुकानामागील गल्लीत असलेला लोखंडी वीजखांब गंजून कमकुवत झाला आहे. तसेच आदर्श चौक, वडाळी टेकडी परिसरात नंदकिशोर राजोर व शैलेश वारपुरकर यांच्या भागात खेळाच्या मैदानाजवळील लोखंडी पोल केवळ केबलच्या आधारावर उभा असल्याचे आढळून आले आहे.या सर्व ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित वीजखांब तातडीने हटवून नवीन पोल उभारावेत, अशी ठाम मागणी नगरसेविका चव्हाण यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून महावितरणने त्वरित पाहणी करून कार्यवाही करावी, अशी अपेक्षा रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

# शेकडो पुस्तकांतून साकारले शिवरायांचे कोलाज भायमरी स्कूलमध्ये शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धामणगाव रेल्वे**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विद्यानिकेतन सीबीएसई स्कूल येथे नुकताच साजरी करण्यात आली. यावेळी कलाशिक्षक अजिक्य काडगळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शाळेच्या ग्रंथालयातील शेकडो पुस्तकांतून छत्रपती शिवाजी महाराजांचे कोलाज साकारले. या कोलाजचे विमोचन धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शरदकुमार अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले.संस्थेचे सचिव ॲड. आशिष राठी, सहसचिव डॉ. असित पसारी, शाळा संचालक राजेंद्र जोशी, प्राचार्य रवी देशमुख व उपप्राचार्य साई नीरजा यांची उपस्थिती लाभली. या निमित्ताने



आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात प्री प्रायमरी स्कूलचा राघव अमोल पवार या चिमुकल्याने शिवाजी महाराजांची, तर अन्वी गोपाल वानखडे हिने जिजाऊ मातेची वेशभूषा साकारली. वर्ग चौथीच्या विद्यार्थिनींनी महाराजांचा पाळणा व नृत्य सादर केली. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या शौर्यगाथेचा पोवाडा व नाटिकेचे सादरीकरण केले. कृष्णा पाचबुधे, त्रिषा राठी व ज्ञानदा देशमुख या विद्यार्थ्यांनीही भाषण दिले. प्राचार्य रवी देशमुख, प्रभारी गायत्री शिंदे व अजिंक्य काडगळे यांनी महाराजांच्या कार्यावर विचार व्यक्त केले. संचालक राजेंद्र जोशी यांनी महाराजांचा जीवनपट उलगडून सांगितला. कार्यक्रमाचे संचालन प्रतीक्षा भोयर, तर आभार प्रदर्शन शुभम मिश्रा यांनी केले.

# विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे भारतीय ज्ञान परंपरेवर कार्यशाळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत भारतीय ज्ञान परंपरा (I.K.S.) या विषयावर विद्याभारती महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. संजय कडू होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. शुभांगी बोरेकर उपस्थित होत्या. व्यासपीठावर डॉ. सुरज रोडे, डॉ. प्रतीक उपासे आणि महाविद्यालयाचे एन.ई.पी. समन्वयक डॉ. विजय मसंद उपस्थित होते.प्रा. बोरेकर यांनी भारतीय संस्कृतीचे जागतिक महत्त्व विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. वेदांचे ज्ञान, ऋचा-सुक्ते, ज्योतिष व व्याकरण यांचे महत्त्व सांगताना त्यांनी जाणून घेणे आणि समजून घेणे यातील फरक अधोरेखित केला. कपिल मुनींच्या सांख्य दर्शनातील सृष्टीची संकल्पना, पतंजलींच्या योगदर्शनातील यम-नियम, तसेच बौद्ध तत्त्वज्ञानातील अष्टांग मार्ग यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. कडू यांनी भारतीय ज्ञान परंपरेत अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड असल्याचे नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्तेची मुळेही भारतीय परंपरेत आढळतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. प्रास्ताविक तेजस्विनी इंगळे, संचालन योगेश किन्नाके तर आभारप्रदर्शन इशा गोठणे यांनी केले. प्राध्यापक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्थायी समितीच्या १६ नवीन सदस्यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महापालिकेच्या पहिल्या आमसभेत शुक्रवारी स्थायी समितीमध्ये १६ सदस्यांची निवड करण्यात आली. महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी या नावांची घोषणा केली.

स्थायी समिती ही महापालिकेची तिजोरी समजली जाते. त्यामुळे या समितीवर जाण्यासाठी सदस्यांमध्ये चढाओढ पाहायला मिळते. पक्षीय बलाबलनुसार भाजपाच्या वाट्याला ५ जागा, काँग्रेसला ३, युवा स्वाभिमानला तीन, राष्ट्रवादी काँग्रेसला २, एमआयएमला २, तर शिंदेसेनेला १ जागा मिळाली. त्यानुसार भाजपाचे मिलिंद बांबल, पद्मजा कौंडण्य, पंचफुला चव्हाण, स्मिता सूर्यवंशी व विनोद तनवाईस, काँग्रेसच्या ललिता रतावा, प्रशांत महल्ले व अस्मा फिरोज खान, युवा स्वाभिमानचे प्रशांत वानखडे, प्रियंका पाटणे व दीपक साहू, राष्ट्रवादी काँग्रेसचे अविनाश मार्डीकर व मीनल सवाई, एमआयएमचे सल्लाउद्दीन इक्राउद्दीन व नजीब खान करीम खान तसेच शिंदेसेनेच्या मंजुषा जाधव यांना स्थायी समितीमध्ये पाठविण्यात आले.

# सोमवारी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४२वा दीक्षांत समारंभ

## ४२,३१७ पदवी, २५५ पदविका; १६८ गुणवंतांचा सन्मान, मुलींची दमदार कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ चा ४२वा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठ परिसरात उत्साहात संपन्न होणार आहे. समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून भारताचे माजी लष्करप्रमुख मनोज पांडे (निवृत्त) उपस्थित राहून दीक्षांत भाषण करणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित राहणार आहेत.विद्यापीठ स्थापनेला यंदा ४३ वर्षे पूर्ण होत असून ज्ञानदानाची परंपरा अधिक भक्कम झाली आहे. सध्या ४५१ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत, त्यापैकी ८ महाविद्यालये स्वायत्त आहेत. बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार सेमिस्टर पद्धती, वेळेवर निकाल आणि कौशल्याधारित अभ्यासक्रमांची अंमलबजावणी यामुळे विद्यापीठाची शैक्षणिक गती वाढली आहे.उन्हाळी २०२५ सत्रात ७४६ परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २,७६,७५७ परीक्षार्थींनी सहभाग घेतला; त्यात १,५६,८९० नियमित तर १,१९,८६७ माजी



विद्यार्थी होते. हिवाळी २०२५ मध्ये ६८९ परीक्षा घेण्यात आल्या असून २,७५,४८७ विद्यार्थी परीक्षेला बसले. वाढती विद्यार्थीसंख्या आणि नव्या अभ्यासक्रमांमुळे विद्यापीठाची व्याप्ती सातत्याने विस्तारत आहे.या दीक्षांत समारंभात ४२,३१७ पदवीकांक्षींना पदवी आणि २५५ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात येणार आहे. विद्याशाखानिहाय पदवीकांक्षी संख्या पुढीलप्रमाणे आहे : मानव विज्ञान - १०,७८७; वाणिज्य व व्यवस्थापन - ७,९१३; विज्ञान व तंत्रज्ञान - १७,१५५; आंतर विद्याशाखीय अभ्यास - ४,४३३. तसेच विविध स्वायत्त महाविद्यालयांतील २,०२९ विद्यार्थ्यांनाही पदवी बहाल करण्यात येणार आहे.गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात येणार असून १२२ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके व २४ रोख पारितोषिके असे एकूण १६८ पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. विशेष म्हणजे ८५ पदक विजेत्यांपैकी ६७ मुली आणि १८ मुले आहेत. म्हणजेच सुमारे ८० टक्के पदके मुलींनी पटकावली आहेत. सर्वाधिक पदके मिळविणाऱ्यांमध्ये नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील कु. निकिता किशोर पुनसे (६ सुवर्ण, १ रोख), आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील कु. पल्लवी बालकृष्ण राठोड (५ सुवर्ण, १ रौप्य) तसेच श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगाव येथील कु. तेजस्विनी विठ्ठल भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील कु. साईश्वरी सत्यजित इंदुरकर (प्रत्येकी ४ सुवर्ण) यांचा समावेश आहे. पाच सुवर्ण, एक रौप्य व एक रोख पारितोषिकासाठी मात्र यंदा कोणीही पात्र ठरले नाही.समारंभात वायय पंडित (डी.लिट) ही सर्वोच्च पदवी डॉ. कमल रामकृष्ण गवई यांना राज्यशास्त्र विषयात प्रदान करण्यात येणार आहे. तसेच ४६६ संशोधकांना आचार्य (पीएच.डी.) पदवी देऊन सन्मानित केले जाणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत २०७, वाणिज्य व व्यवस्थापनमध्ये ७४, मानव विज्ञानमध्ये १२१ तर आंतर विद्याशाखीय अभ्यासमध्ये ६४ संशोधकांचा समावेश आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबवत आहे. स्टार्टअप संकल्पनांना चालना देण्यासाठी सीड फंडही उपलब्ध करून दिला जात आहे. मुलींची उल्लेखनीय कामगिरी आणि संशोधनातील वाढती भागीदारी ही यंदाच्या दीक्षांत समारंभाची ठळक वैशिष्ट्ये ठरत आहेत. शिक्षण, गुणवत्ता आणि महिला सबलीकरणाचा संगम साधणारा हा समारंभ विद्यापीठाच्या प्रगतीचा नवा टप्पा मानला जात आहे.

### पुढील वर्षीपासून नवे सुवर्णपदक व संपादक पुरस्कार

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मध्ये पुढील ४३ व्या दीक्षांत समारंभापासून दोन नवी सुवर्णपदके आणि एक संपादक पुरस्कार सुरू होणार आहेत. डॉ. राजेंद्रसिंह देविसिंह शेखावत, अमरावती यांनी विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र) परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. श्री. देविसिंह रामसिंह शेखावत सुवर्णपदक देण्यासाठी रु. ३ लाखांचा दाननिधी दिला आहे. तसेच व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार वाणिज्य पारंगत परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्व. विष्णूपंत काशीकर स्मृतिप्रित्यर्थ सुवर्णपदक देण्यासाठी विद्यापीठ साधारण निधीतून रु. ३ लाख मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय श्री अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांनी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील वृत्तपत्र संपादकांसाठी स्व. जुगलकिशोर अग्रवाल स्मृती संपादक पुरस्कार स्थापन करण्याकरिता रु. ५ लाखांचा दाननिधी दिला आहे.

# अमरावतीत 'शतक' चित्रपटाच्या प्रचारासाठी पुढाकार हिंदू क्रांती सेनेची मॉल व्यवस्थापनाशी चर्चा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त तयार झालेल्या 'शतक' या चित्रपटाच्या प्रचार-प्रसाराबाबत अमरावतीतील काही चित्रपटगृहांमध्ये अपेक्षित प्रमाणात बॅनर, पोस्टर व शो दिसत नसल्याची नोंद हिंदू क्रांती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली. त्यानुसार शहरातील तापडिया सिटी सेंटर मॉल आणि ई-ऑर्बिट मॉल येथे जाऊन संबंधित व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात आली.कार्यकर्त्यांनी चित्रपटाचे शो वाढविण्याची तसेच प्रमुख ठिकाणी बॅनर- पोस्टर लावण्याची विनंती केली. कुटुंबासह चित्रपट पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांना संघाच्या कार्यावर आधारित 'शतक' चित्रपट पाहण्याचे आवाहन करावे, अशी मागणीही करण्यात आली. मॉल प्रशासनाने सहकार्य करण्याचे आश्वासन दिल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.या वेळी हिंदू क्रांती सेनेचे प्रदेशाध्यक्ष हेमंत मालवीय, संगम गुप्ता, सूरज घारू, विजय सावरकर, सागर मोरे, आदित्य साहू, आकाश मिश्रा, पंकज तिवारी यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांनी कुटुंबासह चित्रपट पाहून संस्कारमूल्यांना बळ द्यावे, असे आवाहनही करण्यात आले.

# राष्ट्रीय महामार्गावरील टोल प्रक्रियेत मोठे बदल १ एप्रिल पासून बदल होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

देशातील राष्ट्रीय महामार्गांवरील (एनएचएआय) टोल नाक्यांवर सध्या फास्टॅग, रोख, ऑनलाईन पद्धतीने वाहन धारकांकडून टोल वसूली केली जाते . या प्रक्रियेत मोठे बदलाचे संकेत आहे.



देशातील राष्ट्रीय महामार्गांवरील टोल नाक्यांवर १ एप्रिल २०२६ पासून रोख रकमेने होणारे व्यवहार पूर्णपणे बंद करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने दिली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास देशभरातील सर्व टोल नाक्यांवर केवळ 'फास्टॅग' किंवा एकत्रित देयक प्रणालीद्वारेच (यूपीआय) शुल्क आकारले जाणार आहे.

केंद्रीय पातळीवरील अधिकृत निवेदनानुसार, राष्ट्रीय महामार्ग टोल व्यवस्थेला संपूर्णपणे डिजिटल स्वरूप देण्याच्या उद्देशाने हा निर्णय प्रस्तावित आहे. यामुळे टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी कमी होईल, प्रतीक्षाकाळ घटेल आणि व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता येईल, असा दावा करण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत 'फास्टॅग'चा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असून सध्या सुमारे ९८ टक्के व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होत आहेत. वाहनांवर लावलेल्या फास्टॅगमुळे टोल नाक्यांवर थांबा न घेता शुल्क आकारणी सुलभ झाली आहे. याशिवाय, टोल नाक्यांवर एकत्रित देयक प्रणालीची सुविधाही (यूपीआय) उपलब्ध करून देण्यात आली असून, तत्काळ आणि सुलभ देयक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

सध्याच्या नियमांनुसार, टोल नाक्यावर वैध व कार्यरत 'फास्टॅग' नसलेल्या वाहनांकडून रोख रकमेने शुल्क भरल्यास दुप्पट आकारणी केली जाते. तर एकत्रित देयक प्रणालीद्वारे देयक केल्यास संबंधित वाहनप्रकाराच्या शुल्काच्या १.२५ पट रक्कम आकारली जाते. या उपाययोजनांमुळे रोख व्यवहारांवरील अवलंबित्व कमी करण्यास आणि टोल व्यवस्थेचे डिजिटलीकरण साध्य करण्यास मदत झाली आहे.

# जिल्ह्यात रेशन लाभार्थीसंख्या वाढविण्यासाठी हालचाली गतिमान

## उत्पन्न मर्यादा वाढीची शक्यता; तहसीलदारांकडून अहवाल मागविला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ अधिकाधिक गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी उत्पन्नाच्या निकषांत वाढ करण्याच्या हालचाली जिल्ह्यात सुरू झाल्या आहेत. सध्या शहरी भागासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागासाठी ४४ हजार रुपये निश्चित आहे. मात्र गेल्या दशकभरातील महागाई व बदललेल्या आर्थिक परिस्थितीमुळे हे निकष अपुरे ठरत असल्याने अनेक कुटुंबे स्वस्त धान्याच्या लाभापासून वंचित राहत आहेत.याची दखल घेत शासनाने उत्पन्न मर्यादा पुनर्निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली असून इतर राज्यांतील निकष, भूक निर्देशांक, मानवी विकास निर्देशांक आणि वाढती महागाई यांचा तौलनिक अभ्यास केला जाणार आहे. त्याआधारे शहरी व ग्रामीण भागासाठी सुधारित उत्पन्न मर्यादा ठरविण्यात येणार आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने सर्व तहसीलदारांकडून यासंदर्भात अभिप्राय मागविला आहे. तालुकानिहाय स्थितीचा आढावा घेऊन एकत्रित अहवाल शासनाकडे पाठविला जाणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी दिली.दरम्यान, केंद्र सरकारकडून राज्याला मिळणाऱ्या अन्नधान्य कोट्यातील सुमारे १५ टक्के धान्य पात्र लाभार्थींच्या अभावामुळे वापराविना पडून राहत असल्याचेही समोर आले आहे. सध्याच्या कडक उत्पन्न निकषांमुळे अनेक गरजू कुटुंबे त्या मर्यादेत बसत नसल्याने त्यांना केशरी किंवा पांढऱ्या रेशन कार्डवर समाधान मानावे लागत आहे. परिणामी, योजनांचा मूळ उद्देश असलेल्या 'गरिबांपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे' या ध्येयात तांत्रिक अडथळे निर्माण होत आहेत.जिल्ह्यातील रेशन लाभार्थीसंख्या वाढविण्यासाठी निकष सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. उत्पन्न मर्यादा वाढल्यास अधिक कुटुंबांना प्राधान्य योजनेत समाविष्ट करता येईल आणि शासनाचा अन्नधान्य कोटा पूर्ण क्षमतेने वापरला जाईल. त्यामुळे प्रशासनाच्या पुढाकाराकडे गरजू नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# महानगरपालिका आयुक्तांचीअंबादेवी-देसाई लेआउटमध्ये स्वच्छता व पायाभूत कामांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शहरातील स्वच्छता, जलनिस्सारण व नागरी सुविधा सुधारण्यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अंबादेवी रोड, शीलांगण रोड, पन्हालाल नगर आणि देसाई लेआउट परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पाहणीत प्रलंबित कामांना तातडीने गती देण्याचे निर्देश देण्यात आले.अंबादेवी रोड व शीलांगण रोडवरील चेंबर दुरुस्तीचा प्रश्न प्रलंबित असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिकेने समन्वय साधून तो त्वरित मार्गी लावावा, असे स्पष्ट आदेश आयुक्तांनी दिले. अंबादेवी परिसरातील खुल्या प्लॉटवर मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित जागा तात्काळ बंद करून मालकांना नोटीस बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या.पन्हालाल नगर येथील नाल्याच्या तुटलेल्या कठड्यांची पुनर्बांधणी व संरक्षण



भिंत उभारण्यासाठी सादर केलेल्या अंदाजपत्रकास निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश देण्यात आले. देसाई लेआउट परिसरातील रस्त्यालगत टाकलेले बांधकाम साहित्य संबंधितांकडून त्वरित हटवण्यास सांगण्यात आले. तसेच सर्व नाल्यांची तातडीने स्वच्छता करून जलनिस्सारण सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला.पाहणीदरम्यान नगरसेवक मिलिंद बांबल, स्वाती कुलकर्णी, लवीना हर्षे, रतन डेंडूले तसेच उपआयुक्त योगेश पिठे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर आदी अधिकारी उपस्थित होते.महानगरपालिकेकडून शहरातील स्वच्छता व मूलभूत सुविधांच्या उन्नतीसाठी सातत्याने क्षेत्रीय पाहण्या सुरू असून नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही केली जात असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# अजिंठा लेणीच्या सहलीतून विद्यार्थ्यांना इतिहास-संस्कृतीचा जिवंत अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१भातकुली**

अमरावती जिल्ह्यातील सुकळी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी पीएम श्री योजनेअंतर्गत आयोजित शैक्षणिक सहलीतून अजिंठा लेणी येथे भेट देत इतिहास, संस्कृती आणि कलेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील या जागतिक वारसा स्थळावरील अप्रतिम भित्तीचित्रे, कोरीव शिल्पकला आणि वास्तुरचना पाहून विद्यार्थी थक्क झाले.घोड्याच्या नालासारख्या दरीत वसलेल्या या लेण्या इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून ते इ.स. पाचव्या शतकापर्यंत खोदल्या गेल्या असून बौद्ध धर्माच्या साधनेसाठी त्यांचा उपयोग होत असे. चैत्यगृह व विहार अशा दोन प्रमुख गटांमध्ये विभागलेल्या लेण्यांमधील स्तूपरचना, बुद्धमूर्ती, बोधिसत्त्वांच्या प्रतिमा आणि जातक कथांवरील भित्तीचित्रांनी विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढवली.सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिक्षकांना अनेक प्रश्न विचारत बारकाईने निरीक्षण केले. पुस्तकात शिकलेली माहिती प्रत्यक्षात पाहिल्याने त्यांचे आकलन अधिक दृढ झाले. गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक निखिल सवाई यांच्या नेतृत्वात ही सहल यशस्वीरीत्या पार पडली. ही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

# रेशन दुकानांतून अर्धा गहू, अर्धा मका अन् संपूर्ण तांदूळ मिळणार

## गव्हाच्या जोडीला मका; जिल्हा प्रशासनाला अद्याप आदेशाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्ह्यातील सार्वजनिक योजनेतील वितरण व्यवस्थेत (रेशन) लवकरच मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्य शासनाकडून अंत्योदय आ प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना आता गव्हाच्य जोडीला 'मका' दिला जाणार असल्याचं माहिती आहे. मात्र, या मक्याच्या समावेशामुळे तांदूळ पूर्ण मिळणार परंतु अर्धा गहू अन् अर्धा मका मिळणार आहे. विशेष म्हणजे, जिल्हा पुरवठा विभागाकडे याबाबत अद्याप



कोणतेही अधिकृत लेखी आदेश आलेले नाहीत, त्यामुळे प्रशासकीय पातळीवरही सध्या वेट अँड वॉचची भूमिका आहे.गरजू कुटुंबांची अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी शासन रेशन दुकानांमार्फत स्वस्त दरात धान्य पुरवते. यामध्ये प्रामुख्याने गहू आणि तांदूळ यांचा समावेश असतो. मात्र, सध्या नवीन धोरणानुसार गव्हासोबत मका देण्याचे नियोजन असल्याची माहिती समोर येत आहे. गोंदिया जिल्ह्यात तांदूळ आणि गव्हाचा वापर आहारात मोठ्या प्रमाणात होतो. त्यात आता रेशनवर मका मिळणार असल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

**स्थानिक पातळीवरून होणार खरेदी?**

जर रेशन लाभार्थ्यांना मका देण्याचा निर्णय घेतला गेला, तर त्याची खरेदी स्थानिक पातळीवरून केली जाईल. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मका कंत्राटदारामार्फत खरेदी केल्यास शेतकऱ्यांना लाभ मिळेल.

**धान्यामध्ये वाढ करावी**

गहू बंद झाल्यास अनेकांचे महिन्याचे बजेट कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, लाभार्थ्यांना अनेक वर्षापासून मोजकेच धान्य वाटप केले जात आहे. महागाईनुसार धान्य वाटपात वाढ केली पाहिजे, अशी मागणी लाभार्थ्यांमधून पुढे येत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने जिल्हा प्रशासनास निवेदन देण्यात येणार असल्याचे लाभार्थ्यांनी केली आहे.

# बच्चू कडू यांचा इशारा: होळीपूर्वी मजुरी द्या, अन्यथा आयुक्त कार्यालय फोडू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

मेळघाटातील मजुरांचे मागील चार महिन्यांपासून प्रलंबित असलेले मजुरीचे पैसे अद्याप मिळाले नसल्याचा गंभीर आरोप करत बच्चू कडू यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. शासनाकडे पत्र व निवेदन देऊनही कारवाई न झाल्याने संताप व्यक्त करण्यात आला.कडू म्हणाले की, ६९ कोटी रुपयांचा जीआर मंजूर झाला असून तो नागपूर आयुक्त कार्यालयाला प्राप्त झाला आहे. संबंधित निधी उपलब्ध असतानाही मजुरांना अद्याप मजुरीचे वाटप करण्यात आलेले नाही. होळीपूर्वी मेळघाटातील मजुरांच्या खात्यात पैसे जमा करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा त्यांनी दिला.जर २८ तारखेपर्यंत मजुरांचे पैसे दिले नाहीत, तर एमआरजीएस आयुक्त कार्यालय फोडू असा तीव्र इशारा बच्चू कडू यांनी दिला.





आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत